दैनिक
# लोकपत्र
अग्रलेखांचा बादशहा भूमिपुत्रांचा मित्र!
नांदेड | बुधवार, दि.४ सप्टेंबर २०२४ | वर्ष ३४ वे | अंक २०५ | किंमत ३ रुपये

## अग्रलेख

(पान ४ वर)

याशिवाय शंकराचार्यांच्या स्तोत्रांचे मराठी रूपांतर, ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरूण टिकेकर यांच्या लेखांचे संपादन, चिपळूणकर व्याख्यानमालेतील व्याख्यानांचे पुस्तक अशी अनेक पुस्तके त्यांच्या खात्यावर जमा आहेत. नाट्य-साहित्यसमीक्षा, नाट्येतिहास, त्याचे सामाजिक अन्वयन यांत त्यांना कायम रस होता. त्यांची ही पुस्तके म्हणजे संपादनाचा वस्तुपाठ होती असे म्हणायला हरकत नाही. एकोणिसाव्या शतकाचा अभ्यास, संशोधन आणि त्याचे दस्तावेजीकरण हे त्यांच्या आयुष्याचे एक ध्येय होते. त्यांच्या जाण्याने या क्षेत्रात नक्कीच पोकळी निर्माण झाली आहे.

**एक आगळा नाटककार; विजय तापस**

## राजकीय नेत्याला धमकावत खंडणी मागण्याचा प्रकार, महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा

**बार्शी /प्रतिनिधी**

बार्शी तालुक्यातील एका वयोवृद्ध नेत्याला धमकावत १५ लाखांची खंडणी मागण्याचा प्रकार सोलापुरात घडला. याप्रकरणी संबंधित नेत्याच्या मुलाने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार एका महिलेसह तिघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात बार्शी तालुक्यातील एका उद्योजकाचाही समावेश आहे.अभिजीत अरुण कापसे (वय ३०, रा. जोतिबाची वाडी, ता. बार्शी) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार याबाबत गुन्ह्याची नोंद झाली आहे. यात ताई दत्ता काळे व अमोल तांबे (रा. सोलापूर) आणि अनिल बाबूराव डिसले (रा. जोतिबाची वाडी, ता. बार्शी) (पान ८ वर)

## विचार पुष्प

जीवनात जबाबदारी घ्यायला हवी, कारण केवळ तुम्ही स्वत:ला हव्या त्या ठिकाणी पोहोचवू शकता, दुसरे कोणीही नाही.

– महात्मा गांधी

## कालमान

शालिवाहन शके १९४६.
विक्रम सवंत २०८०.
शिवशक ३५१.
बुधवार ४ सप्टेंबर २०२४

## हवामान

पुढील २४ तास

आर्द्रता : ८७%
तापमान : २५° से. ते ३०° से.

## दिनविशेष

- एनी बेझेन्ट यांनी होमरूल लीगची स्थापना केली (१९१६)
- शाहीर कृष्णराव साबळे यांचा जन्मदिन (१९२३)
- लक्ष्मीकांत-प्यारेलाल संगीतकार जोडीतील प्यारेलाल शर्मा यांचा जन्मदिन (१९४०)
- प्रख्यात तबलावादक किशन महाराज यांचा जन्मदिन (१९२३)

## गुबूगुबू

खोक्यात डोके
डोक्यात खोके
शिंक्याचे तुटण्याची
वाट पहातात बोके

## चालतय की...



भाजपकडून अण्णा हजारेंना बोलण्याची सुपारी

## व्हाटस् ॲप इमेज

### त्यांनी अंतराळात जाळे तर विणले, पण...



अमिताभ बच्चन होस्ट करीत असलेल्या 'कौन बनेगा करोडपती' या नॉलेज, निर्णयक्षमता आणि संयमाची कसोटी लावणाऱ्या प्रश्नोत्तराच्या शो मध्ये प्रेक्षकांचे देखील उत्तम मनोरंजन आणि प्रबोधन होते.नवी माहिती मिळते. कालच्या शोमध्ये रोल ओव्हर कंटेस्टंट असणाऱ्या वेट लिफ्टिंगपटू कोमल गुप्ता यांना ७५ लाखांच्या स्टेपवर एक प्रश्न विचारण्यात आला.१९७३ साली अराबेला आणि अनीटा नावाचे दोन जीव अंतराळामध्ये काय करणारे पहिले सजीव ठरले? पर्याय होते,ए) घरटं बनवणं,बी) जाळं विणणे,सी) पंखांचा वापर करुन उडणे आणि डी) जन्म देणे.या प्रश्नावर कोमल गुप्ता यांची गाडी अडकली आणि त्यांनी खेळ सोडला.या प्रश्नाचं उत्तर जाळं विणणे असं होतं. १९७३ साली अराबेला आणि अनीटा नावाचे दोन कोळी(कीटक) अंतराळात पाठवण्यात आले होते. हे कोळी शरीरातील अंतर्स्रावाने अंतराळामध्येही जाळं विणू शकतील का? या संशोधनासाठी हा प्रयोग करण्यात आला होता.कोळ्यांनी अंतराळात जाळं तर विणलं, मात्र ते पृथ्वीवरील जाळ्याच्या तुलनेत फारच कमकुवत होतं.विशेष म्हणजे जाळं विणल्यानंतर या कोळ्यांचा मृत्यू झाला.

# मराठवाड्यात कोसळधार धरणे-प्रकल्प भरले



**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी**

ऑगस्ट महिना अखेर कोरडेच असलेले खडकपूर्णा धरण मराठवाड्यात झालेल्या संततधार दमदार पावसाने अखेर तुडुंब भरले! हे धरण ओव्हर फ्लो झाले असून संत चोखासागर असे नाव असलेल्या या प्रकल्पाचे तब्बल १९ दरवाजे उघडण्यात आले आहे. यामुळे नदीकाठच्या तब्बल ३१ गाव खेड्यांना पुराचा धोका निर्माण झाला असून गावांत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.ऑगस्ट अखेर हे धरण कोरडे होते आणि त्यात केवळ मृत जलसाठा शिल्लक होता. त्यामुळे सिंचन, पेयजल आणि पिकांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर बुलढाणा व जालना छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस बरसत आहे.या पावसामुळे जिल्ह्यातील धरण क्षेत्रातील भागात पाऊस पडल्याने धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू झाली. देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा नदी ही धुथडी भरून वाहत असल्याने संत चोखा सागरात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. सध्या ९२ टक्के धरण भरले असून प्रकल्पाचे १९ दरवाजे ०.५० मीटरने उघडण्यात आले आहे. खडकपूर्णा नदीकाठच्या ३३ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच धरण क्षेत्रातीलही काही गावांना सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे.

# नाट्यनिर्मात्याची फसवणूक प्रकरणनिकाली काढावे; मनोज-जरांगे पाटील यांचा न्यायालयात अर्ज

**पुणे /प्रतिनिधी**

नाट्यनिर्मात्याची फसवणूक केल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यातून आम्हाला दोषमुक्त करून प्रकरण निकाली काढावे, असा अर्ज मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी मंगळवारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात केला आहे.



याप्रकरणाची पुढील सुनावणी २४ सप्टेंबर रोजी होणार आहे.प्रथमदर्शनी जरांगे यांच्याविरोधात कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध नाही. फसवणूक करण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. त्यामुळे हे प्रकरण तडजोडीअंती निकाली काढण्यात यावी, अशी विनंती जरांगे यांचे वकील ड. हर्षद निंबाळकर, ड. संतोष खामकर, ड.शिवम निंबाळकर यांनी युक्तिवादात केली. त्यानंतर न्यायालयाने या गुन्ह्यातील तीन आरोपींना तडजोडीचा पर्याय उपलब्ध असेल, तर त्यांना जी रक्कम भरावी लागणार आहे, त्याची सामुहिक जबाबदारी घ्यावी. मध्यस्थ न्यायाधीशांमार्फत न्यायालयात दावा करावा, असे न्यायालयाने सुचविले.

याप्रकरणातील तक्रारदारांच्या वतीने एक वकील मंगळवारी न्यायलयात हजर झाले. त्यांचे म्हणणे पुढील सुनावणीस ऐकून घेण्यात येईल, असे आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी बिराजदार यांनी दिले. सरकार पक्षाकडून सरकारी वकील ड. नीलिमा इथापे-यादव यांनी बाजू मांडली. याप्रकरणाची पुढील सुनावणी २४ सप्टेंबर रोजी होणार आहे.नाटकाचे प्रयोग आयोजित करून त्याचे पैसे न दिल्याप्रकरणी जरांगे-पाटील यांच्यासह अर्जुन प्रसाद जाधव आणि दत्ता बहीर (तिघे रा. अंबड, जालना) यांच्याविरोधात फसवणूक व अपहार केल्याप्रकरणी कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत धनंजय घोरपडे (रा. वारजे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात न्यायालयाने जरांगे पाटील यांना दोनदा समन्स बजावले होते. मात्र, आंदोलनामुळे ते न्यायालयात हजर झाले नव्हते. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्यासह अन्य दोन आरोपींविरोधात अजामीनपात्र वॉरंट बजावले होते. यापूर्वीही जरांगे यांच्याविरोधात न्यायालयात गैरहजर राहिल्याने अजामीनपात्र वॉरंट बजावण्यात आले होते. त्यानंतर मे महिन्यात ते न्यायालयात हजर झाले होते. न्यायालयाने त्यांना ५०० रुपयांचा दंड ठोठावून पुढील सुनावणीला नियमितपणे हजर राहण्याच्या अटींवर वॉरंट रद्द केले होते. त्यानंतरही ते सुनावणीला गैरहजर राहिल्याने अखेर न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध अटकेचे वॉरंट बजावले. त्यानंतर ते गेल्या महिन्यात २ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर झाले होते.

# विनायक मेटेंच्या शिवसंग्राम मध्ये उभी फूट नव्या 'स्वराज्य संग्राम'संघटनेची घोषणा




**कराड /प्रतिनिधी**

शिवसंग्राम संघटनेचे सर्वेसर्वा माजी आमदार विनायक मेटे यांच्या अपघाती निधनानंतर गेली दोन वर्षे शिवसंग्राम संघटना मी टिकवून ठेवली. मात्र, मेटे कुटुंबीयांनी संघटना वाटून घेतल्याचा आरोप करीत 'शिवसंग्राम'चे प्रदेशाध्यक्ष तथा वस्त्रोद्योग महामंडळाचे माजी अध्यक्ष तानाजी शिंदे यांनी त्यांच्या 'स्वराज्य संग्राम' या नव्या संघटनेची घोषणा केली. कराडमध्ये पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अजित बानुगडे, अनंत देशमुख, विक्रांत आम्रे यांची प्रदेश कार्यकारिणीवर निवड करण्यात आली. 'शिवसंग्राम'च्या कार्यकर्त्यांना मी वाऱ्यावर सोडू शकत नसल्यानेच नवी संघटना उभारत असल्याचे सांगत शिंदे म्हणाले, की शिवसंग्राम संघटना २००१ मध्ये स्थापन झाली. राज्याच्या कानाकोपऱ्यात संघटनेचे लाखो कार्यकर्ते आहेत. विनायक मेटे यांच्या निधनानंतर ही संघटना बांधून ठेवण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला. मात्र, अलीकडे मेटे कुटुंबीयांनीच शिवसंग्राम संघटना वाटून घेतल्याने सोबतच्या कार्यकर्त्यांसाठी 'स्वराज्य संग्राम' संघटनेची मुहूर्तमेढ रोवली आहे. ही संघटना गौरवशाली ठरेल, असा विश्वास शिंदे यांनी दिला. देशात समान नागरी कायदा लागू करावा, छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील (पान ८ वर)

# गायीच्या तस्करीच्या संशयावरून गोरक्षकांनी केली १२वी च्या विद्यार्थ्याची हत्या

**हरियाणा /वृत्तसंस्था**

गोमांस आणि गो-स्करीच्या कारणास्तव देशभरात विविध ठिकाणी मारहाणीच्या घटना घडत आहेत. हरियाणाच्या फरीदाबादमध्ये गायींच्या तस्करीवरून २३ ऑगस्ट रोजी हरियाणामधील फरीदाबाद येथे पाच गोरक्षकांनी एका १९ वर्षीय विद्यार्थ्याच्या गाडीचा ३० किमीपर्यंत पाठलाग केला आणि त्याची गोळ्या झाडून हत्या केली. याप्रकरणी आता पाच जणांना अटक करण्यात आले असून त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. आहेत. काही दिवसांपूर्वी हरिणामध्येच पश्चिम बंगालच्या एका मजुराचे गोमांस बाळगल्याच्या संशयावरून मॉब लिंचिंग करण्यात आले होते. तसेच महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात ट्रेनमध्ये एका वृद्धाला गोमांस बाळगल्याप्रकरणी मारहाण करण्यात आली. आर्यन मिश्रा या १९ वर्षीय विद्यार्थ्याचा या घटनेत मृत्यू झाला. त्याच्यावर दोनवेळा गोळीबार करण्यात आला. २३ ऑगस्ट रोजी आर्यन मिश्रा आपल्या मित्रांसमवेत फिरण्यासाठी एका एसयुव्ही गाडीत रात्री घराबाहेर पडला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य आरोपी अनिल कौशिक हा 'लाईव्ह फॉर नेशन' नावाची संघटना चालवतो. ही संघटना गोरक्षणाचे काम करते. अनिल कौशिक आणि इतर आरोपी वरून, सौरभ, कृष्णा आणि आदेश यांना गायीची तस्करी होत असल्याची माहिती खबऱ्यांकडून मिळाली. रेनॉल्ट डस्टर या गाडीतून तस्कार पाहणी करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पाचही जण डस्टर गाडीच्या



मागावर होते.या माहितीनंतर आरोपींनी चुकून आर्यन मिश्रा आणि त्याचे मित्र ज्या डस्टर गाडीत बसले होते. त्या गाडीचा पाठलाग करून गोळीबार केला. यावेळी आर्यनला दोन गोळ्या लागल्या, अशी माहिती त्याचे वडील सिया नंद मिश्रा यांनी आपल्या तक्रारीत दिली. प्राथमिक तक्रारीत गायींच्या तस्करीचा उल्लेख करण्यात आला नव्हता. आर्यनच्या एका मित्राच्या पूर्ववैमनस्यातून ही घटना घडली असावी, असा त्यांचा संशय होता.पोलिसांनी घटनेच्या दिवशीचे सीसीटीव्ही चित्रण ताब्यात घेतले आहे. त्यामध्ये गोरक्षकांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे. भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आर्यनच्या वडिलांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार आर्यन त्याचा मित्र हर्षित गुलाटी, सुजाता गुलाटी, शँकी, सागर गुलाटी आणि किर्ती शर्मा हे हर्षितच्या डस्टर गाडीतून फिरायला बाहेर पडले होते. याची कल्पना त्यांनी पालकांना दिली नव्हती. रात्री ३.३० वाजता हर्षितचे वडील आमच्या घरी आले आणि त्यांनी काहीतरी गडबड झाल्याचे सांगितले. आम्हाला पलवालला निघावे लागेल, असे त्यांनी सांगितले. माझा मुलगा अजय त्यांच्याबरोबर स्कुटीवर बसून पलवालला गेला. १० मिनिटांनंतर माझा मुलगा अजय परतला आणि मलाही त्याच्याबरोबर घेऊन गेला. आम्ही दोघेही बी. के. हॉस्पिटलला गेलो, मात्र तिथून आम्हाला एसएसबी हॉस्पिटलला पाठविण्यात आले. तिथे गेल्यानंतर मी विचारले की, नेमके काय झाले आहे. तेव्हा मला सांगण्यात आले की, माझ्या मुलाला दोन गोळ्या लागल्या आहेत.

# पाकिस्तान चारीमुंड्या चीतपट; बांगलादेशचा ऐतिहासिक मालिका विजय

**ढाका/वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट संघाने पाकिस्तानविरूद्धच्या कसोटी मालिकेत इतिहास घडवला आहे. बांगलादेशने पाकिस्तानच्या घरच्या मैदानावर कसोटी सामन्यात पाकिस्तानचा दारूण पराभव केला आहे. बांगलादेशने पाकिस्तानला रावळपिंडी कसोटीत ६ विकेट्सने पराभूत केलं. या पराभवासह बांगलादेशने २-० ने मालिका आपल्या नावे केली आहे. पाकिस्तानला पहिल्या कसोटी सामन्यात बांगलादेशविरूद्ध १० विकेट्सने पराभव पत्करावा लागला होता. ज्याप्रकारे बांगलादेशने पाकिस्तानला पहिल्यांदा कसोटीत पराभूत करत इतिहास घडवला त्याचप्रमाणे आता त्यांना कसोटी मालिका आपल्या नावे करत मोठा इतिहास घडवला आहे. पाकिस्तानच्या कसोटी इतिहासात प्रथमच बांगलादेशकडून कसोटी मालिकेत पराभव पत्करावा लागला आहे. या मालिकेत




त्यांनी प्रथमच कसोटीत पराभवाचा विक्रमही केला. पाकिस्तान क्रिकेटसाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पाकिस्तानला खराब फिल्डिंग आणि साधारण फलंदाजी या बाबींचा मोठा फटका बसला. आतापर्यंत मोठे संघ पाकिस्तानला त्यांच्या घरच्या मैदानावर पराभूत करायचे, पण आज बांगलादेशसारख्या संघानेही पाकिस्तानचा पराभव केला आहे. बांगलादेशसारखा छोटा संघ क्रिकेटच्या या फॉरमॅटवर जास्त लक्ष केंद्रित करत नाही, पण तरीही त्यांनी पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेत वर्चस्व राखले आणि मालिका २-० अशी जिंकली. दुसऱ्या कसोटी सामन्याची नाणेफेक जिंकत बांगलादेशने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पावसामुळे कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २७४ धावा करत सर्वबाद झाले. ज्यात बांगलादेशच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. तर बांगलादेशचा संघ २६२ धावा करत सर्वबाद झाला. बांगलादेशकडून लिटन दासने १३८ धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर मेहदी हसनने ७८ धावांची निर्णायक खेळी केली. १२ धावांच्या आघाडीसह पाकिस्तानने आपला दुसरा डाव सुरू केला. पण संघ १७२ धावा करत सर्वबाद झाला. यासह बांगलादेशला विजयासाठी १८५ धावांचे आव्हान मिळाले होते जे बांगलादेशने ६ विकेट्स राखत सहज गाठले.१८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बांगलादेशच्या संघाने दमदार सुरुवात केली. झाकीर हसन (४०) आणि शादमान इस्लाम (२४) यांनी पहिल्या विकेटसाठी ५८ धावांची भागीदारी रचली. यानंतर कर्णधार नजमुल हुसेन शांतोने ३८ धावांची तर मोमिनुल हकने ३४ धावांची खेळी खेळून संघाला विजयाच्या जवळ नेले. (पान ८ वर)

# बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास फाशी; ममता बॅनर्जी सरकारचं नवं विधेयक मंजूर

**कोलकाता /वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल सरकारने महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसंच लैंगिक अत्याचार, शोषण आणि बलात्काराच्या घटनांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नवं विधेयक आणलं आहे. या विधेयकातली महत्त्वाची तरतूद म्हणजे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपीला फाशी दिली जाणार ही आहे. बलात्कार आणि शोषणाच्या घटनांच्या विरोधात हे विधेयक आणण्यात आलं होतं हे विधेयक ममता सरकारने मंजूर केलं आहे. विधानसभेत हे विधेयक मांडण्यात आलं जे सगळ्याच आमदारांनी एकमुखाने मान्य केलं.



अपराजिता वुमन चाईल्ड बिल असं या विधेयकाचं ( पश्चिम बंगाल गुन्हेगारी प्रतिबंध कायदा दुरुस्ती विधेयक २०२४ ) नाव आहे. या विधेयकावर चर्चा करण्यासाठी दोन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलवण्यात आलं आहे. मागच्या महिन्यात ९ तारखेला आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय या ठिकाणी एका डॉक्टर महिलेवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. या घटनेने सगळा देश हादरला. या प्रकरणानंतर आता कायदे कठोर करण्याच्या दृष्टीने ममता सरकारने हे नवं विधेयक आणलं ज्या विधेयकाला आता मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे या विधेयकाचं कायद्यात रुपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

बलात्कार, सामूहिक बलात्काराच्या आरोपींना जन्मठेपेची शिक्षा देण्यात यावी. ही शिक्षा त्यांचा मृत्यू नैसर्गिकरित्या होत नाही तोपर्यंत असेल. त्याचप्रमाणे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपींना फाशी दिली जाईल. बलात्कार (पान ८ वर)

# दोन दिवसात महपालिकने केले ११४६ पुरग्रस्तांचे स्थलांतर

## मनपा आयुक्तांनी दिल्या पुरग्रस्त भागांना भेटी



**नांदेड/प्रतिनिधी**

नांदेड शहरात सुरु असलेल्या मुसळधार पावसाने शहरातील जनजिवन विस्कळीत झाले असुन नागरीकांच्या मदतीला मनपा प्रशासन धावुन जाऊन मागील दोन दिवसापासुन मतदकार्य करीत आहे. याच पार्श्वभुमीवर मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी दि. ३ सप्टेंबर रोजी शहरातील सखल भागातील विविध पुरग्रस्त भागांना भेटी देऊन व्यवस्थेची पाहणी केली आहे.

यावेळी आयुक्तांनी शहरातील नदीपात्रालगत व सखल भागात पाणी शिरल्याने महानगरपालिकेच्या वतीने पाण्याचा निचरा करण्याची प्रक्रिया व नागरीकांच्या स्थलांतरीत प्रक्रियेची पाहणी केली. याचबरोबर आयुक्तांनी महापालिकेने स्थापित केलेल्या तात्पुरत्या निवारण केंद्रास भेट देऊन नागरीकांची विचारपुस केली. मागील दोन दिवसांत महापालिका प्रशासनामार्फत एकुण ११४६ नागरीकांना स्थलांतरीत करुन सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. निवारा केंद्रात आश्रय घेतलेल्या नागरीकांसाठी महापालिकेतर्फे जेवण, पिण्याचे पाणी इत्यादी जिवणावश्यक वस्तु पुरविण्यात येत असुन सदरील ठिकाणी आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता, फवारणी, प्राथमिक आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याचाच आढावा आयुक्तांनी प्रत्यक्ष निवारा केंद्रास भेट देऊन घेतला आहे.

यादरम्यान मनपाच्या अग्निशमन विभागातर्फे बोटीचा वापर करुन पुरजण्य परिस्थितीमध्ये अडकलेल्या खडकपुरा (समीराबाग) भागातील ३२ नागरीकांना, लिंगायत स्माशानभुमी जवळील उर्वशी मंदिराजवळ ५ नागरीकांना तर गायत्री मंदिर पांडे गल्ली भागातुन १६ नागरीकांना सुखरुप बाहेर काढुन सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले आहे.

या भेटीदरम्यान पुरग्रस्त भागातील नागरीकांची विचारपुस करुन महापालिका प्रशासन आपणास हवी ती मदत करण्यास तत्पर असल्याचे आश्वासन देऊन मनपा आयुक्तांनी नागरीकांना धीर देण्याचा प्रयत्न केला आहे. तरी नागरीकांनी शहरात उदभवलेल्या पुरजन्य परिस्थितीत घाबरुन न जाता मदतीसाठी महानगरपालिकेच्या आपत्ती शाखेला किंवा जवळच्या क्षेत्रिय कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# आ.अमित देशमुख, आ.मोहनराव हंबर्डे यांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी



**नांदेड/प्रतिनिधी**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीग्रस्त भागाची आ.अमित देशमुख व आ. मोहनराव हंबर्डे यांनी संयुक्तरित्या पाहणी करून या भागातील नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा दिला.

मागील दोन दिवसांपासून नांदेड शहर व परिसराला पावसाने झोडपून काढल्याने तसेच नदीनाल्यांना पूर आल्याने पुराचे पाणी घरात व शेतात घुसून प्रचंड नुकसान झाले आहे. नांदेड दक्षिण मतदारसंघातील जुना पुल,देगलूर नाका,नाव घाट,गौतम नगर, ईदगाह मैदान, खबकपुरा आदी भागातील घरामध्ये पाणी शिरल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेले पीक, तसेच घरातील जीवनावश्यक वस्तु, इतर साहित्य उध्वस्त झाले आहे. अतिवृष्टीमुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. या भागाची पाहणी करून आ. अमित देशमुख व आ. मोहनराव हंबर्डे यांनी नुकसानग्रस्तांना भरपाई मिळावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी अब्दुल सत्तार, सतीश देशमुख तरोडेकर, विठ्ठल पावडे, मनोहर पाटील शिंदे, शरद पवार, दत्ता दिघे, राहुल भाऊ हंबर्डे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**नांदेड : मुसळधार पावसाने गोवर्धन घाट येथील स्मशानभुमी पाण्याखाली गेली असून त्यामुळे अंत्यसंस्कार करण्यासाठी सिडको तसेच इतर भागांमध्ये जाण्यास भाग पडत आहे. (छाया : नरेंद्र गडप्पा)**

# भारतीय ज्ञानपीठ या संस्थेने दामोदर मावजोना दिलेला ज्ञानपीठ पुरस्कार परत घ्यावा; देविदास फुलारी यांची मागणी

**नांदेड/प्रतिनिधी**

ज्ञानपीठ हा अतिशय सन्मानाचा राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार असून तो भारतीय ज्ञानपीठ या संस्थेतर्फे दिला जातो. इ. स. १९४४ मध्ये प्रसिद्ध उद्योगपती साहू शांतीप्रसाद जैन यांनी या संस्थेची स्थापना केली.

भारतीय भाषांमध्ये अनन्यसाधारण निर्मिती करणाऱ्या लेखकास व त्याच्या एकूणच साहित्यिक कर्तुत्वास हा पुरस्कार दिला जातो. भाषेच्या संदर्भात ज्या लेखकाची अभिवृत्ती औदार्याची आहे. अशाच लेखकाला हा पुरस्कार दिला जातो. पण अलीकडे गोव्यातील जेष्ठ कोकणी लेखक दामोदर मावजो यांनी गोव्यातील राजभाषा कायद्यात मराठी भाषा नको असे विधान करून भाषावाद तर निर्माण केलाच आहे शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील भाषा विकृतीही दाखवून दिली आहे. मावजो हे



अतिशय दांभिक लेखक असून उदगीर येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी मराठी प्रेम बोलून दाखवले होते पण ते प्रेम पुतना मावशीचे ठरले. चांगला लेखक हा भारतातील सर्व भाषांना भाषा भगिनी मानत असतो. बऱ्याच वेळा विशिष्ट कारणासाठी किंवा एखादी भूमिका घेऊन लेखक संबंधित पुरस्कार त्या संस्थेकडे परत करतात. तेव्हा भारतीय ज्ञानपीठ संस्थेने भाषा औदार्याची एक भूमिका घेऊन दामोदर मावजो यांना दिलेला ५७ वा ज्ञानपीठ पुरस्कार परत घ्यावा. अशी विनंती साहित्यिक देविदास फुलारी यांनी करून मावजो यांच्या विधानाचा निषेध केला आहे.

# श्री भगवान महावीर यांच्या निर्वाण वर्षानिमित्त जिल्हास्तरीय समिती गठीत

**नांदेड/प्रतिनिधी**

२४ वे जैन तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त राज्य शासनाच्या मंत्री तथा समिती अध्यक्ष मंडलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनाने समिती स्थापन केली आहे. या समितीची बैठक ७ ऑगस्टला मंत्रालयात संपन्न झाली. त्यामध्ये महोत्सव साजरा करण्यासाठी जिल्हा समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यस्तरीय समितीच्या दिशादर्शकानुसार नांदेड जिल्ह्यामध्ये कार्यक्रमांचे आयोजन व त्यासंबंधी विविध शासकीय विभाग, निमशासकीय विभाग, शैक्षणिक संस्था, शाळा व्यवस्थापन, जैन संघ यांच्याशी समन्वय करून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. याबाबतचे पत्र २८ ऑगस्ट रोजी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या आदेशाने काढले आहे. यामध्ये शिवप्रसाद सुराणा, किशोर पाटणी, आनंद जैन, नवल पोकर्णा, ऋषिकेश कोंडेकर आणि ज्योती जैन या सहा जणांचा समावेश आहे. २४ वे जैन तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा त्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करणे, त्यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नगरपरिषद मुख्याधिकारी, शिक्षणाधिकारी, शाळा व्यवस्थापन, जैन संघ यांच्याशी समन्वय साधून कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अशी जबाबदारी समितीवर देण्यात आली आहे.

# जातीय भावना दुखावणाऱ्या संपादकावर गुन्हा दाखल करा –बलजीतसिंघ बावरी

**नांदेड/प्रतिनिधी**

दोन गटात झालेल्या हाणामारीचे वृत्तांकन करताना जातीय उल्लेख करणाऱ्या संपादकावर कारवाई करण्याची मागणी भाई मनी सिंघजी सिख सिकलीकर वेलफेअर सोसायटीचे बलजीतसिंघ बावरी यांनी निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

मध्य प्रदेशातील मथुरा येथील गोविंद नगरमध्ये दोन गटांमध्ये वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना घडली होती. या घटनेत दोन जणांना अटक करण्यात आले. ही घटना निंदणीय असली तरी एका वर्तमान पत्रात जाणीवपूर्वक या बातमीमध्ये सिकलीकर समाजाचा जातीय उल्लेख करून समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. सिकलीकर समाजामध्ये गँगवार असे जातीचा उल्लेख केलेले वृत्त प्रकाशित केल्यामुळे सिकलीकर समाजाच्या भावना दुखावल्या असून समाजाच्या भावना दुखावणाऱ्या संपादकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी बलजीतसिंग बावरी यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

निवेदनावर अजितसिंघ जुन्नी, आझादसिंघ बावरी, शेरसिंघ बावरी, तारासिंघ टाक, ज्योतसिंघ दुधाने, जसमिंदरसिंघ बावरी, जितूसिंग टाक आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे आज अतिवृष्टी पाहणीसाठी नांदेड दौऱ्यावर

## शेतकऱ्यांनी दौऱ्यात सहभागी होण्याचे जिल्हाप्रमुख माधव पावडे यांचे आवाहन

**नांदेड/प्रतिनिधी**

युवा सेना प्रमुख तथा माजी मंत्री आदित्य ठाकरे हे दि. ४ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात विरोधी पक्षनेते अंबादास दानवे ही त्यांच्यासोबत असणार असून अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त भागाची ते पाहणी करणार आहेत. शिवसेनेच्या सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी या दौऱ्यात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाप्रमुख माधव पावडे यांनी केले आहे



नांदेड जिल्ह्यात गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. या भागातील शेकडो हेक्टरवरील पिके पाण्याखाली आली आहेत. आसना नदीला आलेल्या पुराच्या पाण्यामुळे खरीप आणि बागायती शेतीचेही नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी माजी मंत्री तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे दि. ४ सप्टेंबर रोजी नांदेड दौऱ्यावर येणार आहेत. अतिवृष्टीग्रस्त भागाची ते पाहणे करतील. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या दौऱ्यात नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी, युवा सेनेसह महिला आघाडी आणि शिवसेनेच्या सर्व शाखा च्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख माधव पावडे यांनी केले आहे.

# नागेश पाटील कल्याण हे व्हॉईस ऑफ मीडियाच्या कार्य सेवा विशेष पुरस्काराने सन्मानित



**नांदेड/प्रतिनिधी**

साई शिर्डीच्या पावन भूमीत नुकतीच पार पडलेल्या पार पडलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया या विश्वव्यापी पत्रकार संघटनेच्या महाराष्ट्र राज्यस्तरीय शिखर अधिवेशनात ग्रामीण पत्रकार चळवळीतील व्हॉईस ऑफ मीडिया चे नायगाव तालुकाध्यक्ष नागेश पाटील कल्याण सेवा कार्य विशेष पुरस्कार सन्मान २०२४ ने गौरविण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर बीडच्या माजी खासदार प्रितम मुंडे, शेतकरी नेते रविकांत तुपकर, माजी खासदार हेमंत पाटील, संपादक प्रकाश पोहरे, जेष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, पुढारी वृत्त वाहिनीचे प्रसन्न जोशी, राजश्रीताई पाटील, व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप भाई काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के प्रदेश कार्यवाहक बालाजी मारगुड, मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया, पंढरीनाथ बोकारे, नांदेड जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी, बाळासाहेब पांडे आदींसह संघटनेचे देश व विदेशातील पदाधिकारी सदस्य आणि राज्यभरातील हजारो पत्रकार बांधवांची उपस्थिती मोठी उपस्थिती होती. साई शिर्डीच्या दरबारी ३१ ऑगस्ट १ सप्टेंबर या दोन दिवसीय राज्यस्तरीय शिखर अधिवेशनाद्वारे राज्य भरातील पत्रकारांसाठी दोन दिवसीय विशेष मेजवानी देत त्यांची प्रश्न पत्रकारीते पुढिल आव्हाने यावर विशेष मंथन करित यातुन निष्पन्न चर्चेतुन वेगवेगळे आठ ठराव मंजूर करून संघटनेद्वारे शासन दरबारी पाठपुरावा करण्याचे निर्णय हि घेण्यात आले. अशा व्यापक अधिवेशनात नायगाव व्हॉईस ऑफ मीडिया च्या सेवा कार्याची विशेष दखल घेऊन ग्रामीण पत्रकार चळवळीतील अग्रगण्य पत्रकार व्हॉईस ऑफ मीडिया चे नायगाव तालुकाध्यक्ष नागेश पाटील कल्याण यांना व्हॉईस ऑफ मीडिया चा सेवा कार्य विशेष पुरस्कार सन्मान २०२४ ने गौरविण्यात आल्याने नायगाव व्हॉईस ऑफ मीडिया टिमचे सर्वत्र कौतुक करून नागेश पाटील कल्याण यांना पुढील वाटचालीसाठी सर्वस्तरातून शुभेच्छाही देण्यात येत आहेत.

# डॉ.तसनीम पटेल यांना काळदाते स्मृती पुरस्कार जाहीर

## नऊ सप्टेंबर रोजी अंबाजोगाईत वितरण

**नांदेड/प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील नारायण दादा काळदाते स्मृती प्रतिष्ठान यांच्या तर्फे देण्यात येणारा नारायणदादा काळदाते स्मृती सन्मती पुरस्कार यंदा बिलोलीच्या भुमीकन्या सुप्रसिध्द परखड वक्त्या डॉ.तसनीम पटेल यांना जाहीर झाला आहे.



नऊ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस या पुरस्काराने गौरविण्यात येते. या वर्षीचा हा चौदावा पुरस्कार आहे.

आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित समारंभात जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ.प्रा.अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते डॉ. तसनीम पटेल यांना गौरविण्यात येणार आहे. प्राचार्य डॉ.पटेल यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात खूप मोठे कार्य आहे. त्यांनी अनेक महत्त्वाची पदे भुषविली असुन महाराष्ट्र शासनाचा सावित्रीबाई फुले पुरस्कार, उत्कृष्ट राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीयरत्न पुरस्कार अशा विविध प्रकारच्या पुरस्कारांनी यापूर्वी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्काराची निवड प्रतिष्ठानच्या निवड समितीने केली आहे.यात प्राचार्य डॉ.मधुकरराव गायकवाड व प्राचार्य डॉ.अनिरूध्द जाधव यांचा समावेश आहे.

डॉ.तसनीम पटेल यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सिध्दार्थ तलवारे, प्राचार्य डॉ.गणेश जोशी, डॉ.संजय मोरे, डॉ.छाया मोरे यांनी अभिनंदन केले आहे.

# एमजीएममध्ये पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळा संपन्न

**नांदेड/प्रतिनिधी**

एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात टेकलाईफ क्लबच्यावतीने पर्यावरणपूरक गणपती तयारकरण्याच्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.१ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात करण्यात आले.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू माती, नैसर्गिक रंग आणि पाण्यात विरघळणारे साहित्य वापरून गणपतीच्या मूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन घेतले. सदर कार्यशाळेचा उद्देश पर्यावरणाची हानी न करता गणेशोत्सव साजरा करण्याबाबत जनजागृती करणे आहे. कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याची प्रक्रिया तज्ज्ञ मार्गदर्शक कविता जोशी यांच्या कडून शिकून घेतली आणि त्यामागील महत्त्व जाणून घेतले. महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांनी विद्यार्थ्यांसाठी अशा कार्यशाळांची आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभागी होऊन पर्यावरण रक्षणासाठी योगदान देण्याचे आवाहनही केले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली असून त्यांनी स्वतःच्या घरात पर्यावरणपूरक गणपती बसवण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यशाळेसाठी ११८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सदर कार्यशाळा महाविद्यालयातील टेकलाईफ क्लब समन्वयक प्रा.अनिकेत भोरे तसेच प्रा. रितेश सिंह बैस, विजय देशमुख आदी यांच्या पुढाकारातून घेण्यात आली. कार्यशाळेच्या यशस्वीततेसाठी संस्कृती मोरे, शिवम मेरेवार, सागर लाभशेठवार, नकुल सूमठाणकर, तुषार राठोड आदी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन कार्यशाळा यशस्वी केली. पर्यावरणपूरक कार्यशाळेतील सहभागाबद्दल विद्यार्थ्यांचे उपप्राचार्य डॉ.शिरिष कोटगीरे, विभागप्रमुख डॉ.अर्चना



राजुरकर, डॉ.सुलभा दाचावार, डॉ.महेश हरकरे, डॉ.अर्षद हाश्मी, प्रो एस.ए.हाश्मी, डॉ. कल्पना जोंधळे- पैठणे, डॉ. गोविंद हंबर्डे आदींनी अभिनंदन केले आहे.



संपादकीय

# एक आगळा नाटककार; विजय तापस

प्रा. विजय तापस यांना मराठी कविता आणि नाटक या दोन्ही कलाप्रकारांत रस असला तरी नाटक हा कलेच्या क्षेत्रातील सर्वोच्च पातळीवरचा आविष्कार आहे, कारण नाटक हे थेट जीवनाला भिडणारे असते, अशी त्यांची कायम धारणा होती आणि ती शेवटपर्यंत तशीच राहिली. त्यांनी १९४७ पूर्वीच्या विस्मृतीत गेलेल्या नाटकांचे विवेचन, विश्लेषण करणारे 'कस्तुरीगंध' हे सदर 'लोकसत्ता'मध्ये २०२२ साली लिहिले होते. ते 'पुनर्भेट : विस्मृतीत गेलेल्या नाटकांशी' या नावाने नुकतेच पुस्तकरूपात प्रसिद्ध झाले आहे. ही त्यांची शेवटची शब्दकृती. साहित्य, संस्कृती, कला याबद्दल त्यांना नेहमीच आस राहिली. त्यातून त्यांचे अनेक संशोधन, अभ्यास प्रकल्प उभे राहिले. रामनारायण रुईया महाविद्यालयात त्यांनी दीर्घकाळ अध्यापन केले. या कॉलेजच्या 'नाट्यवलय'चे बराच काळ ते मार्गदर्शक होते. रुईयाचा महाविद्यालयीन नाट्यक्षेत्रात दबदबा निर्माण करण्यात त्यांचा हा सहयोग महत्त्वाचा ठरला.त्याचवेळी वृत्तपत्रे, नियतकालिके यांत त्यांचे साहित्य आणि नाट्यविषयक लेखनही जोमाने सुरू होते. रुईयाचा इतिहास 'अमृतगाथा' नावाने कॉफीटेबल बुक स्वरूपात प्रसिद्ध करण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. मुंबई विद्यापीठाच्या 'शहराचे भूषण' या ग्रंथात प्रमुख संशोधक म्हणून त्यांनी कामगिरी बजावली होती. कवी नारायण सुर्वे यांच्या दुर्मीळ कवितांचे संपादन त्यांनी 'गवसलेल्या कविता'रूपात केले होते. अलीकडेच 'सत्यकथा'तील निवडक कवितांच्या दोन खंडांचे संपादनाचे मोठे काम त्यांनी हातावेगळे केले होते.नाट्यदिग्दर्शक अरविंद देशपांडे, ज्येष्ठ रंगकर्मी दामू केंकरे आणि नाटककार विजय तेंडुलकर यांच्यावरील पुस्तकांचे सहयोगी संपादक म्हणूनही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याचप्रमाणे 'सत्यकथा' आणि 'मौज'चे साक्षेपी संपादक श्री. पु. भागवत यांच्यावरील 'सृजनव्रती : श्री. पु. भागवत' या ग्रंथाच्या संपादनातही त्यांचा मोलाचा सहयोग होता. याशिवाय शंकराचार्यांच्या स्तोत्रांचे मराठी रूपांतर, ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरूण टिकेकर यांच्या लेखांचे संपादन, चिपळूणकर व्याख्यानमालेतील व्याख्यानांचे पुस्तक अशी अनेक पुस्तके त्यांच्या खात्यावर जमा आहेत. नाट्य-साहित्यसमीक्षा, नाट्येतिहास, त्याचे सामाजिक अन्वयन यांत त्यांना कायम रस होता. त्यांची ही पुस्तके म्हणजे संपादनाचा वस्तुपाठ होती असे म्हणायला हरकत नाही. एकोणिसाव्या शतकाचा अभ्यास, संशोधन आणि त्याचे दस्तावेजीकरण हे त्यांच्या आयुष्याचे एक ध्येय होते. त्यांच्या जाण्याने या क्षेत्रात नक्कीच पोकळी निर्माण झाली आहे.

# साखर उद्योगाचा वाढावा 'गोडवा'

साखर उद्योग हा ग्रामीण भारताचा आर्थिक कणा खरा; पण अलीकडच्या काळात हाच कणा या ना त्या कारणाने कमकुवत झाल्याने ग्रामीण अर्थकारणाची घडी विस्कटू पाहात आहे. तेव्हा साखर उद्योगाला पुन्हा एकदा पुनर्वैभव मिळवून देणे गरजेचे. याच पार्श्वभूमीवर काही तज्ज्ञ मंडळी साखर कारखान्यांनी साखरेसह उपपदार्थाचे उत्पादन वाढवावे, असा आग्रह धरतात. त्याविषयी काही प्रयत्न सुरु असतानाच केंद्र सरकारची सोयीस्कर धोरणं त्यामधील अडथळे ठरतात. आपण जाणतोच की, गतसाली १ डिसेंबर रोजी मोदी सरकारने इथेनॉल निर्मितीवर अनेक निर्बंध लादले. साखर उत्पादन कमी होईल आणि लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर साखरेचे दर वाढले तर जनतेच्या नाराजीत भर पडेल, अशी भीती सत्ताधारी भाजपला होती. त्यामुळे साखरेचे उत्पादन वाढवून त्याचे दर स्थिर ठेवण्यासाठी सरकारने इथेनॉल निर्मितीला मर्यादा घातली. अर्थातच कारखान्यांचे अर्थकारण बिघडले. इथेनॉल निर्मितीसाठी बहुतांशी साखर कारखान्यांनी कर्ज काढून प्रकल्प उभे केले होते. मोठी गुंतवणूक यामध्ये केली होती; पण सरकारी धोरणामुळे इथेनॉल निर्मितीवर मोठ्या मर्यादा आल्या. मात्र, उत्पादन चांगले झाल्याने साखर दर वाढले नाहीत. त्याचे समाधान सरकार आणि जनतेला झाले असले तरी, साखर कारखान्यांना आर्थिक फटका बसला. या पार्श्वभूमीवर इथेनॉल निर्मितीला पुन्हा परवानगी द्यावी, अशी मागणी कारखानदारांनी लावून धरली. केंद्रात सलग तिसऱ्यांदा सत्ता बळकावणाऱ्या मोदी सरकारला ही मागणी मान्य करावी लागली. या पार्श्वभूमीवर केंद्राने आठ महिन्यापूर्वी घेतलेला निर्णय नुकताच मागे घेतला आहे. इथेनॉल निर्मितीवरील सर्व निर्बंध हटवले आहेत. साखर कारखानदार आणि डिस्टिलरीज यांना दिलेल्या आदेश पत्रात, केंद्र शासनाचे अन्न व सार्वजनिक वितरण विभागाने म्हटले आहे की, एक डिसेंबर २०२३ चे आदेश मागे घेण्यात आले आहेत. नव्या हंगामात साखर कारखान्यांना आणि डिस्टिलरीजना उसाच्या रस, सिरप, बी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल तयार करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

नव्या धोरणाचे बांधावे तोरणः

इथेनॉल निर्मितीबाबत केंद्र सरकारला उपरती झाल्याने देशातील साखर उद्योगाला मोठा दिलासा मिळेल. त्याचाच परिणाम म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र गतीशील होण्यास मदत होईल. शेवटी ग्रामीण अर्थकारणाला गती द्यायची असेल, तर साखरउद्योगाचा 'गोडवा' वाढवावाच लागेल. दोष बाजूला सारून नवतंत्राच्या जोरावर साखरेसह उपपदार्थ उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे लागेल. साखर उद्योगाचे ग्रामीण अर्थकारणातील महत्त्व लक्षात घेऊन आतापर्यंत ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी नेटाने आणि नेकीने प्रयत्न केले. तरीही या ना त्या प्रतिकूल परिस्थितीमुळे साखरउद्योग पुनःपुन्हा संकटात सापडतो आहे. यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून साखर उद्योगाने साखरेबरोबरच उपपदार्थांचे उत्पादन वाढविण्यासाठी सरकारने नव धोरणाचे तोरण बांधायला हवे.



साखर उत्पादन कमी होऊन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर साखरेचे दर वाढले तर जनतेच्या नाराजीत भर पडेल, या भीतीपोटी मोदी सरकारने गतसाली एक डिसेंबर रोजी इथेनॉल निर्मितीवर अनेक निर्बंध लादले. मात्र आता केंद्र सरकारला उपरती झाली आहे; इथेनॉल निर्मितीवर लादलेले निर्बंध हटवले आहेत. त्यामुळे देशातील साखर उद्योगाला मोठा दिलासा मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र गतीशील होण्यास मदत होईल. शेवटी ग्रामीण अर्थकारणाला गती द्यायची असेल तर, साखरउद्योगाचा 'गोडवा' वाढवावाच लागेल. दोष बाजूला सारून नवतंत्राच्या जोरावर साखरेसह उपपदार्थ उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे लागेल.

**उमाकांत टिळक**

मुख्य म्हणजे इथेनॉलचे उत्पादन वाढविण्याची गरज ओळखायला हवी. इथेनॉल हे पेट्रोलमध्ये मिसळवून त्याचा इंधन म्हणून वापर केला जातो. इथेनॉल मिश्रीत पेट्रोल वापरासंबंधीचे धोरण आपल्याकडे जानेवारी २००३ मध्ये जाहीर करण्यात आले. त्यानुसार प्रारंभी ५ टक्के इथेनॉल पेट्रोलमध्ये मिश्रणाची परवानगी देण्यात आली. त्यापुढचे पाऊल म्हणून हे प्रमाण वाढविण्यात आले. इथेनॉल पेट्रोलमध्ये मिश्रणाचे प्रमाण सध्या ११.६० टक्के असे आहे. साखर आणि अन्य शेतीमाल उत्पादन आधारित प्रकल्पातून नोव्हेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या चार महिन्यांमध्ये २९८ कोटी लिटर इथेनॉलचा करार तेल कंपन्याशी करण्यात आला आहे. यापैकी प्रत्यक्षात १६९ कोटी लिटर इथेनॉल तेल कंपन्यांना पुरवण्यात आले. याचा अर्थ असा की, इथेनॉलचा मागणी तसा पुरवठा होत नाही. सरकारी धोरणाचा धरसोडपणाच त्यास कारणीभूत ठरतो. हे टाळायला हवे. काळाची पावले ओळखून सरकारला इथेनॉल संदर्भात ठोस धोरण आखावेच लागेल. हे धोरण साखर उद्योगाला, प्रत्यक्षात ऊस उत्पादकांना तारक कसे ठरेल, हे पाहावे लागेल. तूर्त तर साखर कारखानदारी वेगवेगळ्या कारणांनी धोक्यात आली आहे. यंदा साखरेचे उत्पादन वाढूनही साखर उद्योगाला आर्थिक फटका बसला आहे. साखर कारखान्यांवरील कर्जाचा बोजा वरचेवर वाढतच चालला आहे. एकूणच साखर उद्योगाची कोंडी झालेली आहे. ही कोंडी फोडायची असेल तर, इथेनॉल निर्मितीमध्ये वरचेवर वाढ करावी लागेल. मागणी तसा पुरवठा यामध्ये समतोल राखावा लागेल.

ऊस नव्हे डोंगा :

काळ बदलला आहे आणि अशा या काळात आता ऊस पिकाला 'कल्पतरु' म्हणूनच ओळखावे लागेल. त्याचे कारण असे की, बदलत्या काळात तंत्रज्ञान अधिक विकसित झाल्याने जगातील काही देशात उसाच्या उपयुक्ततेचा 'गोडवा' वाढला आहे. कधी काळी गूळ, साखरेचे उत्पादन घेणारे साखर कारखाने आता उसापासून इथेनॉल, प्रेसमड, कंपोस्ट आदींचीही निर्मिती करू लागले आहेत. वीज निर्मितीचेही प्रयोग यशस्वी होत आहेत. याचा अर्थ असा की, 'पाणी खाऊ' पीक म्हणून उसाला वरकरणी कितीही 'डोंगा' ठरविले जात असले तरी, त्याच्या सर्वंकष उपयुक्ततेचा 'गोडवा' अमर्याद आहे. तेव्हा त्याचा लाभ आपणही घेतलाच पाहिजे. पैकी उसाचा उपपदार्थ म्हणून निर्मित होणाऱ्या इथेनॉलचा वापर पेट्रोमध्ये हळूहळू का होईना, पण वाढविला पाहिजे.

हे धोरण राबविताना प्रथमतः या ना त्या कारणाने चालढकल झाली. इथेनॉल वापरासाठी गाड्यांमध्ये आमूलाग्र बदल करावा लागेल, असाही एक कांगावा मोटार उत्पादकांनी केला; पण तो तज्ज्ञांनी बऱ्यांपैकी खोडून काढला. तरीही पेट्रोल कंपन्या साखर कराखान्यांकडे उपलब्ध असलेल्या इथेनॉलचा वापर करण्यासाठी आवर्जून धजावल्या नाहीत. दरम्यानच्या काळात साखर उद्योजकांनी बरीच आदळआपट केली. तेव्हा साखर कारखान्यांचे अंतिमत: ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी त्यात लक्ष घातले. मोटार, पेट्रोल कंपन्या आणि साखर उद्योजक यांच्यामध्ये सुवर्णमध्य घडवून आणण्याची भूमिका निभावली. दरम्यान पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाबाबत शासनालाच फारसा रस नसल्याचे बोलले गेले. त्यामागचे कारण असे की, शासनाला साखर उद्योगातून भरमसाठ कर मिळतो. साखरनिर्मिती व त्यातून अल्कोहोल निर्मितीत विविध कारणांसाठी शासनाला सरसारी ५०७४ रुपये प्रतिटन इतके कर रुपाने मिळतो. तेव्हा उसापासून थेट इथेनॉल निर्मिती केली तर, कराची रक्कम कमी होण्याची शक्यता. म्हणूनच शेतकऱ्यांच्या कष्टावर, स्वप्नावर पोतेरा फिरवून दरवर्षी हजारो कोटी रुपये तोट्यात जाणाऱ्या भ्रष्ट तेल कंपन्यांना प्रोत्साहित केले जाते, असा आरोप जैवइंधन शेतकरी संघटनेचे नेते शामराव देसाई यांनी मागे एकदा केला होता. असो. अपेक्षा हीच की, सरकारने इथेनॉलबाबत आडेवेढे घेताना नैसर्गिक इंधन साठ्यांच्याही मर्यादा ओळखायला हव्यात. माहिती अशी की, देशात दरसाल साधारणपणे ७ लाख कोटी रूपयांचे क्रुड ऑईल आयात होते. अशा प्रकारची भल्या मोठ्या रकमेची बचत करायची असेल, तर इथेनॉलमिश्रीत इंधनाचा वापर वाढवण्याला पर्याय नाही. मुळातच इथेनॉलमिश्रित पेट्रोलचा वापर सर्वंकषदृष्ट्या इष्ट समजला जातो. हे इंधन वापरल्यामुळे वायू प्रदूषणाला आळा बसतो. वायू प्रदषण ही वाढत्या वाहनांची देण आहेच. तेव्हा इथेनॉल मिश्रीत पेट्रोलमुळे त्यात उचित फरक पडणार असेल, तर वाहनधारकांनीही इथेनॉल मिश्रीत पेट्रोलचाच आग्रह धरायला हवा. ब्राझीलमध्ये शंभरटक्के शुद्ध इथेनॉल मोटार इंधन म्हणून वापरले जाते. त्याच प्रकारे आपल्याकडेही बदल केला पाहिजे. जेणेकरून साखर उद्योगाचा 'गोडवा' वाढतानाच ग्रामीण अर्थकारणाला चालना मिळेल. अंतिमतः शेतकऱ्यांच्याही वाट्याला 'अच्छे दिन' येतील.

## लोकमंच — सामाजिक परिस्थिती बदलली आहे का?

'उपवर्गीकरणावरील आक्षेपांना उत्तरे आहेतच!' हा लेख वाचला. हजारो वर्षांपासून संधी नाकारल्यामुळे वंचित राहिलेल्या समूहांना न्याय्य प्रतिनिधित्व देण्याच्या उदात्त हेतूने, सामाजिक भेदभावाला आधार मानून संविधानात आरक्षणाची तरतूद करण्यात आली. सामाजिक शोषणाचा व भेदभावाचा समान सामना करावा लागलेल्या मागास जातींचा समूह तयार करून, त्यांना समान पातळीवर आणून या अशा समूहांना म्हणजेच अनुसूचित जाती व जमातींना आरक्षण देण्यात आलेले आहे. आता यामधील काही विशिष्ट जातींनाच या आरक्षणाचा फायदा झाला असून काही जाती अद्याप मागेच राहिल्या आहेत असे निरीक्षण नोंदवून, या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालाद्वारे राज्यांना बहाल केला आहे. समान परिस्थितीमध्ये व एका समान बिंदूवरून सुरुवात केल्यानंतरही काही जाती किंवा समूह मागे राहिले असतील तर त्यांच्यात शिक्षणासंबंधी जागृती करून त्यांचे शिक्षणाचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे गरजेचे तसेच तर्कसंगत आहे.उपवर्गीकरणाला विरोध करणाऱ्यांचा रोख ज्या जातींत शिक्षणाचे प्रमाण वाढले त्यांच्याकडे आहे. शैक्षणिक प्रगतीचा त्यांना फायदा झाला. ज्या जातींनी अंधश्रद्धांना कवटाळले व शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार स्वीकारला नाही किंवा उशिरा स्वीकारला, त्यांच्यात तुलनेने कमी शैक्षणिक प्रगती घडून आली हे वास्तव आहे. हे बदलण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. आता दुसरा मुद्दा येतो क्रीमीलेयरचा. अनुसूचित जाती, जमातींचे आरक्षण हे सामाजिक मागासलेपणावर आधारलेले असून त्याचा आधार आर्थिक कधीच होऊ शकत नाही. क्रीमीलेयर लागू करावे असे जर न्यायालयाला वाटत असेल तर, अनुसूचित जाती जमातींचे प्रतिनिधित्व पुरेसे आहे का, तसेच ते लागू करण्याइतपत सामाजिक परिस्थिती बदलली आहे का, याचादेखील विचार करावा लागेल.

**– सचिन अ. सदाफुले,**
**छत्रपती संभाजीनगर**

## किल्ले भक्कम आणि पुतळे कोसळतात?

पुतळा कोसळला, नेहमीप्रमाणे पाहणी दौरे झाले. त्यानंतर जी कारणे देण्यात येत आहेत ती पाहता सर्व जण स्थापत्यशास्त्राचे अभ्यासक असल्यासारखेच वागताना दिसतात. हे सारे पाहून प्रश्न पडतो की, शिवाजी महाराजांच्या काळात उभे राहिलेले गड-किल्ले अद्याप अभेद्या असून ते समुद्राच्या लाटांचा सामना कित्येक वर्षे करत आहेत, त्यांची तटबंदी आजही टिकून आहे, तर अवघ्या आठ महिन्यांपूर्वीचा पुतळा कोसळला कसा? दर्जातील त्रुटीच याला कारणीभूत नव्हेत का? सध्या तरी कोणीही स्वत:ची चूक असल्याचे मान्य करण्यास तयार नाही. सत्ताधारी आणि विरोधकांनी या विषयाचे राजकारण न करता असे का झाले आणि यापुढे काय काळजी घ्यावी लागेल, याचा अभ्यास करावा.

**– प्रमोद पांडुरंग कांदळगावकर**

# सलखन जीवाश्म उद्यान लिहिणार जीवसृष्टीचा नवा इतिहास

सलखान जीवाश्म उद्यान हे सोनभद्र जीवाश्म पार्क म्हणून ओळखले जाते, हे उत्तर प्रदेशमधील एक जीवाश्म उद्यान आहे. हे सोनभद्र जिल्ह्यातील राज्य महामार्गावरील सलखन गावाजवळ रॉबर्ट्सगंजपासून १२ किमी अंतरावर आहे. उद्यानातील जीवाश्म जवळपास १.४ अब्ज वर्षे जुनी आहेत. अलीकडेच, उत्तर प्रदेश पर्यटन विभागाने २०२६ पर्यंत युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये सलखन जीवाश्म उद्यानाचा समावेश करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. उत्तर प्रदेशचे पर्यटन मंत्री डॉ नीलकंठ तिवारी आणि यूपी इको-टुरिझम डेव्हलपमेंट बोर्डाचे अतिरिक्त संचालक प्रखर मिश्रा यांनी उद्यानाला अलीकडेच भेट दिली. त्याप्रसंगी ते म्हणाले, वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत या स्थळाचा समावेश व्हावा यासाठी भारत सरकारला एक सविस्तर अहवाल देण्यात येणार आहे. युनेस्कोला पाठवले जाणारे अंतिम डॉसियर २०२५ पर्यंत तयार होण्याची शक्यता आहे. सोनभद्र जीवाश्म उद्यानात सापडलेली जीवाश्मं हे एकपेशीय वनस्पती आणि स्ट्रोमेटोलाइट प्रकारातील आहेत. कैमूर वन्यजीव अभयारण्याला लागून असलेल्या कैमूर रेंजमध्ये सुमारे २५ हेक्टर क्षेत्रात हे उद्यान पसरले आहे, हे उद्यान राज्य वन विभागाच्या अखत्यारीत येते. या उद्यानात आढळणारी जीवाश्मं इतर जीवाश्मांपेक्षा वेगळी आहेत आणि भूगर्भशास्त्रज्ञांसाठी महत्त्वपूर्ण आहेत. पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या उत्पत्तीबद्दल महत्त्वपूर्ण माहितीचा उलगडा त्यांच्या अभ्यासातून होऊ शकतो. बनारस हिंदू विद्यापीठातील भूगर्भशास्त्र विभागातील प्रा. वैभव श्रीवास्तव यांनी सलखन जीवाश्म उद्यानाला ५० पेक्षा जास्त वेळा भेट दिली, ते 'हिंदुस्थान टाइम्स'शी संवाद साधताना म्हणाले, आमच्यासारख्या भूगर्भशास्त्रज्ञांसाठी ही जीवाश्मं खूप महत्त्वाची आहेत कारण त्यांच्यावरील सखोल संशोधनामुळे पृथ्वीवरील जीवनाची उत्पत्ती कधी झाली यासाठीच नेमका काळ निश्चित करण्यात मदत होऊ शकते.



**संशोधनात काय आढळून आले?**

प्रा. श्रीवास्तव यांनी स्पष्ट केले की पूर्वी असे मानले जात होते की ५७० दशलक्ष वर्षांपूर्वी जीवन अस्तित्वात नव्हते. तथापि, नंतरच्या संशोधनात निळ्या- हिरव्या शैवालच्या रूपात समुद्रात जीवसृष्टी अस्तित्त्वात होती, हे लक्षात आले. सलखन जीवाश्म पार्क आणि यलोस्टोन नॅशनल पार्क ही जगातील दुर्मीळ ठिकाणे आहेत ज्यांनी पूर्वी अस्तित्वात असलेल्या जीवसृष्टीचे पुरावे दिले आहेत, त्यामुळे वैज्ञानिक अभ्यासासाठी ही ठिकाणे महत्त्वपूर्ण आहेत. स्ट्रोमेटोलाइट्स म्हणून ओळखले जाणारे जीवाश्म ६०० दशलक्ष ते १.५ अब्ज वर्षे जुने असल्याचा अंदाज आहे, या प्रदेशात विंध्य समुद्र अस्तित्वात होता तेव्हापासून ते अस्तित्त्वात आहे. कालांतराने, या समुद्राचे रूपांतर आताच्या विंध्याचल पर्वतात झाले. प्रा. श्रीवास्तव यांनी या जीवाश्मांच्या शैक्षणिक महत्त्व आणि भौगोलिक पर्यटनाच्या महत्त्वासाठी त्यांच्या जतन करण्याच्या भर दिला. ऑक्टोबर २०२२ मध्ये, त्यांनी भारत, अमेरिका, बांगलादेश आणि नेपाळमधील भूवैज्ञानिकांच्या टीमसह या उद्यानाला भेट दिली होती.

**प्रथम शोध कधी लागला?**

१९३० च्या दशकापासून भूवैज्ञानिकांना सध्याच्या पार्क परिसरात सापडलेल्या जीवाश्मांची माहिती आहे. या क्षेत्रात संशोधन करणाऱ्यांमध्ये ऑडेन (१९३३), माथूर (१९५८ आणि १९६५) आणि प्रोफेसर एस. कुमार (१९८०-८१) यांचा समावेश आहे. ८ ऑगस्ट २००२ रोजी जिल्हा दंडाधिकारी भगवान शंकर यांच्या हस्ते जीवाश्म उद्यान म्हणून त्याचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. उद्यानाला भेट देणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. पूर्वी उद्यानात दररोज १० ते १५ लोक येत असत, नंतर ही संख्या ५० पर्यंत वाढली आणि सध्या दररोज सुमारे ५० ते १०० पर्यटक उद्यानाला भेट देतात.

**सलखन जीवाश्म उद्यान**

भारतीय भूगर्भीय सर्वेक्षणानुसार सलखन जीवाश्म उद्यानामध्ये खडकांवर एकाग्र वलयांच्या रूपात उत्तम प्रकारे विकसित झालेले स्ट्रोमॅटोलाइट्स आढळतात. हे उद्यान विंध्य खोऱ्यात स्थित आहे, जे एक महत्त्वाचे आंतरखंडीय खोरे आहे. येथे प्रोटेरोझोइक कालखंडातील गाळाचे खडक आढळतात, ज्यांचे वय अंदाजे १७०० ते ९०० दशलक्ष वर्षांदरम्यानचे आहे. या प्राचीन खडकांमध्ये स्ट्रोमॅटोलाइट्स व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे जीवाश्म किंवा जीवाच्या शरीराचे अवशेष आढळत नाहीत. जीएसआय ने स्पष्ट केले आहे की, स्ट्रोमॅटोलाइट्स ही सायनोबॅक्टेरियाद्वारे तयार केलेली जैविक रचना आहे, ज्यांना निळे शैवाल देखील म्हणतात, जी समुद्राच्या तळावर वाढतात आणि पातळ थरांमध्ये संरक्षित असतात

## थोडक्यात

### राणे नगरला आले, बोलून गेले

अहमदनगर : सकल हिंदू समाज मोर्चाच्या माध्यमातून भाजपचे आमदार नितेश राणे राज्यात ठिकठिकाणी मोर्चे काढत आहेत. तेथे त्यांची आक्रमक भाषण होत आहेत. त्यांना त्यावर मुस्लिमांकडून विरोधही होत आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा फॉर्म्युला लोकसभा निवडणुकीत फारसा चालला नाही. त्यामुळे भाजपमधील नेते मंडळीही याबाबत सावध झाली आहेत. राणे यांना आता स्वत:च्या पक्षातील नेत्यांकडूनही विरोध होताना दिसू लागला आहे. नगर जिल्ह्यातही राणे नुकतेच येऊन गेले. त्यानंतर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी राणे यांचे नाव न घेता अशा भडक भाषणाला विरोध केला आहे.

### ब्राझीलने एक्स'वर बंदी का घातली?

नवी दिल्ली:ब्राझीलमध्ये मायक्रोब्लॉगिंग साइट एक्स'वर तिथल्या सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. मोबाइल आणि वेब अशा दोन्ही आवृत्त्या ब्राझीलच्या नागरिकांना आता वापरता येणार नाहीत. सर्वोच्च न्यायालय आणि एक्सचे मालक इलॉन मस्क यांच्यात दीर्घकाळ सुरू असलेल्या वादाची परिणती अखेर एक्स'वरील बंदीत झाली. न्यायालयाच्या कामकाजात अडथळा आणणे, गुन्हेगारी संघटनांना पाठबळ दिल्याचे गंभीर आरोप एक्स'च्या विरोधात आहेत; त्यासंबंधात तपास सुरू आहे. चुकीची माहिती आणि द्वेषपूर्ण संदेश पसरवल्याच्या आरोपाखाली एक्स'ची काही खाती निलंबित करण्याचे आदेश या वर्षाच्या सुरुवातीला न्या. मोरेस यांनी दिले होते. यात ब्राझीलचे माजी अध्यक्ष जैर बोल्सोनारो यांच्या समर्थकांचीही काही खाती होती. त्यानंतर एक्स'ने ब्राझीलमधील आपले कामकाज त्वरित बंद करण्याची घोषणा केली होती.

### मोशन पोस्टर प्रदर्शित करत नवीन चित्रपटाची केली घोषणा

पुणे: हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या तीन मराठी चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅटट्रिकनंतर आणि यंदाचा सर्वाधिक गाजलेला चित्रपट नाच गं घुमा'ने भारत आणि परदेशात मराठी बॉक्स ऑफिस गाजवल्यावर लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांनी त्यांचा नवीन चित्रपट मु.पो. बोंबिलवाडी'ची आज घोषणा केली. चित्रपट २५ डिसेंबर २०२४ रोजी रोजी प्रदर्शित करण्याचे नियोजन असून चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित करून चित्रपटाची घोषणा करण्यात आली.

### एसएमएफजी इंडिया क्रेडिटद्वारे १०००व्या शाखेचा आरंभ

मुंबई: एसएमएफजी इंडिया क्रेडिट कं. लि., भारताची गैर-बँकींग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) क्षेत्रातील एक प्रमुख कंपनी असून, त्यांनी वाशी, नवी मुंबई इथे आपल्या १०००व्या शाखेच्या आरंभाची घोषणा केली आहे. या लक्षणीय प्रसंगामुळे देशभरातील आपला विस्तार करण्यामागील आणि अद्याप शिरकाव न झालेल्या बाजारपेठांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचवण्यातील कंपनीची अढळ निष्ठा दृग्गोचर झाली आहे. या लक्षणीय मैलाच्या टप्प्याच्या निमित्त, एसएमएफजी इंडिया क्रेडिटनं इंडिया पोस्टसोबत सहयोग करुन एक विशेष आवरण आणि माय स्टँप प्रकाशित केले. या अधिकृत अनावरण प्रसंगी श्री. योगी कोजी, कॉन्सुल-जनरल, जपानचे मुंबईतील कॉन्सुलेट-जनरल, श्री. अभिजीत बनसोडे, संचालक - टपाल सेवा (मुख्यालय) महाराष्ट्र परिमंडळ, सोबत श्री. शांतनु मित्रा, सीईओ आणि एमडी, एसएमएफजी इंडिया क्रेडिट हे मान्यवर उपस्थित होते.

## एकही बाधित व्यक्ती पंचनामा पासून वंचित राहता कामा नये पालकमंत्री अब्दुल सत्तार तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश

**सिल्लोड / कन्नड /प्रतिनिधी**

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर नदी-नाले काठावरील गावे, शेतीपिकांचे आणि रस्ते, पूल बाधित झाले आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने योग्य समन्वय ठेवून तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे पूर्ण करावेत. यामध्ये एकही बाधित व्यक्ती पंचनामा पासून वंचित राहता कामा नये, असे निर्देश अल्पसंख्यांक विकास, औकाफ, पणन मंत्री तथा पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड , कन्नड तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी पाहणी



करून प्रत्यक्ष आढावा घेतला. पालकमंत्र्यांनी सिल्लोड तालुक्यातील भराडी, बोरगाव बाजार, बोरगाव सारवणी तर कन्नड तालुक्यातील नाचनवेल, पिशोर, रामनगर, साखरवेल, वासडी, महेगाव हस्ता, पळशी खुर्द शिवारात बाधित भागाचा दौरा करून येथील नुकसानग्रस्तांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. सद्यस्थितीत प्रमणापेक्षाही जास्त नुकसान झाले असून, जिल्ह्यातील नदी-नाले काठावरील शहरी आणि ग्रामीण भागाला याचा मोठा फटका बसला आहे. ग्रामीण भागातील शेतीपिकांसह गुरे-ढोरे, पशुधन, दुभती जनावरे वाहून गेली आहेत. पुराच्या पाण्याने रस्ते आणि पुलांचे भाग तुटल्यामुळे गावांचा संपर्कही तुटला आहे. त्यामुळे तो तातडीने पूर्ववत करण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. सत्तार यांनी जिल्हा यंत्रणेला दिल्या. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा गाढे, शिवसेना जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत , सिल्लोड कृउबा समितीचे सभापती केशवराव तायडे, कन्नड शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे, कन्नड गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## घाटगेंच्या हाती तुतारी, शरद पवारांनी डाव टाकला; दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना एकाचवेळी धक्का

**कोल्हापूर/प्रतिनिधी**

लोकसभेत ८० टक्के स्ट्राईक रेट राखणाऱ्या शरद पवारांनी कोल्हापुरात भाजपला मोठा धक्का दिला आहे. समरजीत घाटगेंच्या हाती तुतारी देत शरद पवारांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर डाव टाकला आहे.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जाणाऱ्या घाटगेंनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. गैबी चौकातील सोहळ्याला शरद पवारांची उपस्थिती आहे. घाटगेंच्या पक्षप्रवेशामुळे कागल विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा संघर्ष होण्याची शक्यता आहे. २००९ मध्ये शरद पवार यांच्या उपस्थितीत सदाशिवराव मंडलिक यांच्या सभेला जशी गर्दी होती, तशीच गर्दी आज झाल्याचं घाटगे त्यांच्या भाषणात म्हणाले. शरद पवारांच्या पक्षात येत्या काही दिवसांत आणखी अनेकांचे प्रवेश होतील. पण माझ्या पक्षप्रवेशावेळी पवार साहेब स्वत: उपस्थित आहेत. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मला हा मान, सन्मान कागलच्या जनतेमुळे मिळाला आहे, अशा भावना घाटगेंनी बोलून दाखवल्या.

## गरुडझेप गणेश मित्रमंडळाची कार्यकारणी जाहीर

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

गरुडझेप गणेश मित्रमंडळाच्या १७ व्या गणेशोत्सवासाठी कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. अध्यक्ष किशोर अण्णा ठुबे आणि प्रमोद दिवेकर सर यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यकारणीची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारणीची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली.नवीन कार्यकारणीची संरचना पुढीलप्रमाणे आहे: अध्यक्ष: राहुल नरोडे उपाध्यक्ष: जालिंदर चव्हाण सचिव: मदन देशमुख कार्याध्यक्ष: विशाल मोहिते, शुभम बचाटे, प्रदीप शिंदे, अजय शिंदे, अमोल जाधव स्वागतध्यक्ष: स्वप्निल वाघमारे, सतीश गायकवाड, अनिल शिंदे प्रसिद्धी प्रमुख: अक्षय जगदाळे, चंद्रकांत तायडे, ऋषिकेश जाधव, आकाश ठोंबरे, शंकर वखरे या कार्यकारणी बैठकीत प्रमुख

मार्गदर्शक म्हणून सुनील बडसल, प्रा. वाघ सर, विठ्ठल शेलार, दत्ताभाऊ गरड, वाल्मीक मामा पवार, प्रशांत काकडे सर, रत्नकार कोठावदे, प्रशांत कोचर, किशोर गव्हाणे, मंगेश जगताप, संदीप शिंदे, नंदकिशोर भाले, दत्ता बोडखे, योगेश खोतकर, सुनील कोल्हे आणि विनोद लंबे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत पुढील गणेशोत्सवासाठी विविध योजनांची चर्चा करण्यात आली आणि सर्व सदस्यांनी उत्सवाची तयारी योग्य प्रकारे केली जाईल,

## बैलांस चारा टाकून घराकडे येताना बत्तीस वर्षे इसम नदी पात्रात वाहून गेला

**कन्नड/प्रतिनिधी**

बैलांस चारा टाकून पायी घरी परतणाऱ्या संतोष विश्वनाथ थोरात वय ३२ हा ब्राम्हणी नदीच्या पात्रात वाहून गेल्याची घटना दि. २ सप्टेंबर रोजी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास घडली. रविवार आणि सोमवारी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने ब्रम्हाणी नदी दुथडी वाहत होती दिनांक २ सप्टेंबर रोजी संतोष विश्वनाथ थोरात आणि त्याचा मित्र आदिनाथ एकनाथ धनेधर हे बैलांस चारा टाकून संध्याकाळी सात वाजता घराकडे पायी येत असताना शहरातील माळीवाडा जवळील ब्राम्हणी नदीत वाहून जात होते.मात्र त्याच रस्त्याने



वाल्मीक आबाराव आबाराव राहणे येत असताना त्यांना हे दोन्ही युवक पाण्यात वाहून जाताना दिसले.आणी वाल्मीक राहणे यांनी कोणताही विचार न करता या युवकांना वाचविण्याचा प्रयत्न सुरू केले पहिल्या टप्प्यात आदिनाथ एकनाथ धनेधर यास नदीपात्रातून बाहेर काढण्यास वाल्मीक राहणे यांना यश आले. नंतर संतोष थोरात यास पकडले मात्र संतोष चा शर्ट फाटल्याने संतोष थोरात हा वाल्मीक राहणे यांच्या हातातून निसटला नंतर तो सापडलाच नाही.रात्री ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी शोध मोहीम सुरू केली मात्र उपयोग झाला नाही.दिनांक ३ सप्टेंबर रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथील अग्निशामक दलाच्या जवानांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. अग्निशामक दलाच्या जवानांनी नदी पात्रात होडीच्या साहयाने शोध मोहीम सुरू केली दुपारी एक वाजेच्या सुमारास नदी काठी असलेल्या एरंडाच्या झाडास संतोष विश्वनाथ थोरात अडकलेले जवानास दिसला आणि जवानांनी त्यास नदीच्या बाहेर काढले. संतोष थोरात यास कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी संतोष थोरात यास मृत्यू घोषित केले. संतोष थोरात यांची उत्तरणीय तपासणी करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. संतोष थोरात यांस नदीपात्रातून बाहेर काढण्यासाठी अग्निशामक दलाचे लक्ष्मण कोल्हे, दिपक गंगावणे, दिनेश एलदोंडे , महिंद्र खोतकर, अजीक भागत, किशोर कोळी यांनी परिश्रम घेतले.तर नगरपरिषदेच्या वतीने पाणी पुरवठा निरीक्षक देविदास पाटील, स्वछता निरीक्षक परदेशी, कार्यालय अधीक्षक प्रशांत देशपांडे,रितेश, यांनी परिश्रम घेतले.

## राज्य परिवहन महामंडळाचे चालक वाहक संपावर प्रवाशांसह विद्यार्थ्यांचे हाल, आगाराचे पांच लाखांचे नुकसान

**कन्नड/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या चालक वाहक यांच्या विविध मागण्यासाठी दिनांक ३ सप्टेंबर रोजी सकाळी संपावर गेल्याने प्रवाशांसह विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले असून या संपामुळे कन्नड आगाराचे पांच लाखांचे उत्पन्न बुडाले असल्याचे राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.चालक व वाहक यांच्या संपामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या कन्नड आगारातून इतर जिल्ह्यांत जाणाऱ्या शहादा, धुळे, पुणे ,शेगांव, भुसावळ, नाशिक, सोलापूर या बस गेल्या नाहीत.तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर, वैजापूर, गंगापूर, सिल्लोड, फुलंब्री, लासूर तर कन्नड तालुक्यातील चिकलठाण,



चिंचोली, दिगांव ,नागद, वडनेर, जेऊर , भांरबा ,पिशोर ,कळंकी, करंजखेड, याठिकाणी बस गेली नसल्याने प्रवाशांसह कॉलेज शाळा यातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची मोठ्या प्रमणात हाल झाली या संपामुळे खाजगी वाहनधारकांनी अवाच्या सव्वा भाडे वसूली केली. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांनी कन्नड आगार प्रमुख यांना भ्रमणध्वनीवरून सांगितले की वाहक व चालक यांच्या प्रश्नांबाबत मुंबई येथे सयाद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री महोदयानी संघटनेचे पदाधिकारी आणि महामंडळाचे अधिकारी यांची बैठक ठेवली आहे.त्यामुळे संप करु नका असे वाहक चालक यांना कळवावे असे आगार प्रमुखांना सांगितले यावरून आगार प्रमुख बाळासाहेब राठोड यांनी वाहक व चालक यांच्याशी चर्चा केली.मात्र वाहक आणि चालक यांनी काही एक ऐकले नाही. वाहक चालक यांच्या संपामुळे प्रवाशासह विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले. या संपात मेकॅनिकल तसेच प्रशासकीय कर्मचारी सहभागी नाहीत एकशे अकरा वाहक आणि चालक संपावर गेल्याने गणेशोत्सवासाठी कन्नड आगारातून पंचवीस बस मुंबई येथे पाठवायच्या आहेत त्या वेळेवर पाठविणे आवश्यक आहे संपामुळे कन्नड आगाराचे आजचे पांच लाखांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे कन्नड आगार प्रमुख बाळासाहेब राठोड यांनी दैनिक लोकपत्रशी बोलताना सांगितले

## खुलताबादमध्ये बैलपोळा उत्साहात साजरा

**खुलताबाद/प्रतिनिधी**

खुलताबाद तालुक्यातील सर्जा-राजाला बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या पशुधनाला साजरीत आणि विविध सजावटीसह बहरलेले बैलपोळा मनोभावे साजरा केला. काही सधन शेतकऱ्यांनी वाजत गाजत आपल्या बैलांची फेऱ्या काढल्या, आणि बळीराजांनी भगवे फेटे व पांढरे कपडे परिधान केले. सर्जा-राजा, जे वर्षभर शेतातील कामात शेतकऱ्यांना मदत करतात, त्यांना सन्मान देण्यासाठी बैलपोळ्याच्या दिवशी त्यांना चंगाळी शिंगे, कलरने सजावट व झुलीने सजवण्यात आले. काही शेतकऱ्यांनी ग्रामीण भागात मिरवणुका काढून बैलांची कृतज्ञता व्यक्त केली. घराघरात पुरणपोळीचा स्वयपाक करून बैलांची पूजा केली आणि



त्यांना पुरणपोळी खाऊ घातली. बैलपोळा हा शेतकऱ्यांनी आपल्या बैलांसाठी कृतज्ञता व्यक्त करण्याचा पारंपरिक सण आहे. यावर्षी मागील काही आठवड्यांपासून पावसाने उघडीप दिली होती, पण ऐन पोळ्याच्या वेळेला पावसाने उघडे दिले. त्यामुळे खुलताबाद शहर आणि तालुक्यात पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बैलपोळ्या निमित्त शेतकरी दिवसभर उपाशी राहून बैलांचा उपहास करतात, आणि सायंकाळी बैलांना पुरणपोळीचा जेवण दिल्यानंतरच शेतकरी जेवण करतात. सणाच्या दिवशी शेतकऱ्यांनी बैलांची सजावट करून विधीवत पूजा केली आणि बैलांना व इतर पशुधनांना पुरणपोळीचे जेवण दिल्यानंतर त्यांनी उपवास सोडला. बैलपोळा उत्सवाने खुलताबादमध्ये आनंद व उत्साहाचा वातावरण निर्माण केला.

## स्कोडा ऑटो इंडियाकडून ऑल न्यू स्लाव्हिया मॉण्टे कार्लो लाँच

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

स्कोडा ऑटो इंडियाने भारतात ऑल-न्यू स्लाव्हिया मॉण्टे कार्लो लाँच केली आहे. स्पोर्ट थीमला अधिक पुढे घेऊन जात कंपनीने कुशक व स्लाव्हिया लाइन अपमध्ये ऑल-न्यू स्पोर्टलाइन श्रेणी देखील सादर केली आणि या कार्ससाठी उल्लेखनीय ऑफरची घोषणा केली, ज्यामुळे भारतातील ग्राहकांसाठी मूल्य व पर्याय दर्जा वाढला आहे.या नवीन सादरीकरणांबाबत मत व्यक्त करत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक श्री. पीटर जनेबा म्हणाले, ''मॉण्टे कार्लो बॅजचे ग्राहकांसोबत प्रबळ नाते आहे, ज्यामधून स्पोर्ट व यशाचा उत्साह दिसून येतो. मला सांगताना आनंद होत आहे की, आम्ही आज स्लाव्हिया मॉण्टे कार्लो लाँच केली आहे. हे लाँच युरोपबाहेर आमच्यासाठी मोठी बाजारपेठ असलेल्या भारतात स्कोडा ब्रँड विकसित करण्याच्या आमच्या धोरणाचा भाग आहे. ही विशेष कार अद्वितीय, लक्षवेधक व स्पोर्टी आकर्षकतेचा शोध घेत असलेल्या ग्राहकांचे लक्ष वेधून घेईल, ज्यामधून स्टाइलचा अद्वितीय अनुभव मिळेल. ही कार रॅली मॉण्टे कार्लोमध्ये आमची ११२ वर्षे, १२९ वर्षांचा संपन्न वारसा आणि भारतातील २४ वर्षांच्या कार्यसंचालनाप्रती मानवंदना आहे. आम्ही दोन नवीन ट्रिम्स 'स्लाव्हिया स्पोर्टलाइन' आणि 'कुशक स्पोर्टलाइन' देखील सादर केल्या आहेत, ज्यामधून श्रेणी विकसित व समकालीन ठेवण्यासोबत ग्राहकांना उत्तम पर्याय व मूल्य देण्याप्रती आमचा मनसुबा दिसून येतो. स्पोर्टलाइन आकर्षक दरामध्ये मॉण्टे कार्लोच्या स्पोर्टी आकर्षकतेचा शोध घेत असलेल्या ग्राहकांसाठी परिपूर्ण आहे. नवीन मॉण्टे कार्लो आणि स्पोर्टलाइन ऑफरिंग्जसह आम्ही भारतात शाश्वतपणे स्कोडा फॅमिली वाढवण्यास उत्सुक आहोत.''

## स्वच्छ नवी मुंबई अभियानात इनऑर्बिट मॉल्स आणि यशलोक वेलफेअर फाऊंडेशनची नवी मुंबई महानगरपालिकेला मदत

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

शॉपिंग सेंटर उद्योगातील अग्रगण्य असलेल्या इनऑर्बिट मॉल्सने त्यांच्या सीएसआर उपक्रमाचा भाग म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेला करत आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत सर्वात स्वच्छ शहर असलेल्या महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना शहर स्वच्छ ठेवण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या 'सफाई मित्रां'साठी रिफ्लेक्टीव्ह जॅकेटचे प्रायोजकत्व इनऑर्बिट मॉल्स आणि यशलोक वेलफेअर फाऊंडेशनकडून देण्यात आले आहे. ही जॅकेट्स दृष्टीहीन व्यक्ती, वंचित महिला आणि फाऊंडेशनचा एक भाग असलेल्या तरुणांनी तयार केली आहेत. नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात या प्रायोजकत्वाची औपचारिकता करण्यासाठी अधिकृत कार्यक्रम संपन्न झाला. अशी एकूण ३१००




जॅकेट्स सफाई मित्र' किंवा एसडब्ल्यूएम कामगारांच्या वापरासाठी वितरीत करण्यात आली आहेत, ज्याने सध्या सुरू असलेल्या स्वच्छता ऑपरेशन्स दरम्यान त्यांची दृश्यमानता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासोबतच कचरा विलगीकरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यात मदत केली आहे. यावेळी के रहेजा कॉर्पोरेशनचे ग्रुप सल्लागार किशोर भटिजा; नवी मुंबई महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त महापालिका आयुक्त सुनील पवार, नगर नियोजन (एडीटीपी) चे सहाय्यक संचालक सोमनाथ केकाण, पालिकेचे शहर अभियंता शिरीष अरदवाड यांच्यासह इतर प्रमूख पाहुणे यावेळी उपस्थित होते. हा उपक्रम इनऑर्बिटचे जनतेचे कल्याण आणि शहरी शाश्वततेसाठी बांधिलकी अधोरेखित करतो. ही रिफ्लेक्टिव्ह जॅकेट प्रदान करून, इनॉर्बिट मॉल्स आणि यशलोक फाऊंडेशन एकत्रितपणे नवी मुंबई महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याला पाठिंबा देतात आणि स्वच्छ, सुरक्षित नवी मुंबईच्या व्यापक ध्येयामध्ये योगदान देतात.

## नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार:उदयसिंह बोराडे

**मंठा/प्रतिनिधी**

मंठा आणि परतुर तालुक्यासह नेर-सेवली भागात आज रविवारी (ता. १) सकाळपासुनच सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन आर्थिक मदत तात्काळ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मंठा शिव-सेनेचे तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी करतांना ते बोलत होते.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतल्यानंतर उदयसिंह बोराडे यांनी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याशी बोलत होते.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतल्यानंतर उदयसिंह बोराडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधुन त्यांना नुकसानीची माहिती दिली.

शनिवारी (ता. ३१) रात्रीपासुनच अतिवृष्टी सुरु असून, या भागात पावसाने थैमान घातले आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कापुस, सोयाबीन, तुर पिकांसह फळबागांचेही

मोठ्या प्रमाणाव नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आ लेला घास या अतिवृष्टीने हिरावुन घेतला आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ प्रशासनाने पंचनामे करुन आपला अहवाल शासनाकडे पाठवावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवुन द्यावी, अशी मागणी तालुकाप्रमुख बोराडे यांनी केली आहे.

# अतिवृष्टी बाधित भागांचे पंचनामे करताना अचूकता ठेवा -जिल्हाधिकारी अभिनव गोयल

**हिंगोली/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अतिवृष्टी बाधित भागांचे पंचनामे करताना योग्य समन्वय राखून अचूक माहिती भरावी. तसेच जिल्ह्यातील पशुधन, शेती, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तसेच रस्ते आणि पुलांसह वीज, पिण्याचे पाणीपुरवठा आदी मूलभूत सोयीसुविधा पुढील दोन दिवसांत सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावेत. जलसंधारण, जलसंपदा विभागानेही त्यांच्याअंतर्गत येणाऱ्या गाव तलाव आणि पाझर तलावांची दुरुस्ती करून घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आज येथे संबंधित विभाग प्रमुखांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातून आज ते दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर जाधव आदी उपस्थित होते.



जिल्ह्यात पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेत पिकांचे, शेती, पशुधन आणि वीज पुरवठा तसेच रस्ते, पुलांचे आणि सार्वजनिक मालमत्ताचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करताना एकही बाधित व्यक्ती मदतीपासून वंचित राहू नये, याची खबरदारी घ्यावी. हे पंचनामे तात्काळ सुरु केल्यास माहितीमध्ये अचूकता येईल. त्यामुळे संबंधित विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पथके नेमून या कामाला प्राधान्य द्यावे. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी पाणीपुरवठा तात्काळ पूर्ववत करण्यास प्राधान्य द्यावे. ज्या गावातील पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्या आणि त्यासाठी लागणारा वीजपुरवठा पूर्ववत करण्यापूर्वी त्यांच्या गावनिहाय याद्या तयार कराव्यात. त्यामुळे त्या गावांना पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा सुरळीत करणे सोईचे होईल, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच पावसामुळे नदीवरील रस्ते आणि पुल क्षतीग्रस्त झाले असून, एनएचएआयचे रस्ते आणि पुलांची दुरुस्ती करण्याचे काम तातडीने सुरु करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी केल्या. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या रस्त्यांचेही काम तातडीने पूर्ववत करून घेण्याचे निर्देश दिले आहे. सावरखेडा येथील रस्ता पुलाचा एक भाग पूर्ण तुटला आहे. तसेच सोडेगाव येथील कयाधू नदीवरील रस्ता आणि पुलाचे काम तातडीने सुरु करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी दिले. रस्ते आणि पुलाचे दुरुस्तीचे काम पूर्ववत करताना स्थानिक लोकप्रतिनिधी आणि तहसीलदार, गावचे सरपंच किंवा पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांना कामाबाबत माहिती द्यावी. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यात योग्य समन्वय राहील, याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शेतकऱ्यांचे पाळीव प्राणी, दुभती जनावरे यांचे झालेले नुकसान आणि पुराच्या पाण्यात वाहून गेलेले पशुधन यांचे पंचनामे तात्काळ करून घ्या. पाणी ओसरल्यानंतर मलेरिया आणि साथीचे रोग पसरणार नाहीत, यासाठी रोगप्रतिबंधक फवारणी, लसीकरण करून घेण्याच्या सूचना दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रुग्णालयांमधील उपकरणांचे झालेले नुकसान याची तात्काळ माहिती सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी गोयल यांनी दिले.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून नुकसानग्रस्त भागांची पाहणी

## बाधित भागाचे तातडीने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश

**परभणी/प्रतिनिधी**

जिल्ह्यात अतिवृष्टीने बाधित झालेल्या ग्रामीण आणि शहरातील भागाची आज जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. अतिवृष्टीमध्ये बाधित झालेल्या भागातील नुकसानीचे तातडीने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

यावेळी तहसीलदार संदीप राजपुरे, माधव बोथीकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पवन खांडके अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गावडे यांनी आज पुर्णा तालुक्यातील ताडकळस व चुडावा आणि परभणी शहरातील जमजम कॉलनी आणि बरकत पुरा येथील पिंगळगड नालाचे पाणी घरांमध्ये शिरल्यामुळे शेख जाकीर शेख गुलाम याच्या घराची पाहणी केली. यावेळी नागरिकांनी महावितरणकडून वारंवार वीजपुरवठा खंडीत होत असल्याबाबत सांगितले.

गावडे यांनी महावितरण आणि मनपा अतिरिक्त आयुक्त यांना याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पुर्णा तालुक्यातील ताडकळस, चुडावा येथील शेतात प्रत्यक्ष जाऊन पिकाच्या नुकसानीची पाहणी केली व जिल्ह्यामध्ये नुकसान झालेल्या भागांचे तातडाने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी व संबंधित तलाठी मंडळ अधिकारी, कृषी सहायक यांना दिलेत. यावेळी तालुका कृषी अधिकारी, कृषी सहायक, तलाठी, मंडळ अधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

# वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा राष्ट्रसंतांची कर्मभूमी ते महात्मा बसवेश्वरांच्या कर्मभूमीपर्यंत निघणार

**अहमदपूर/ता.प्रतिनिधी**

समाजातील प्रतिष्ठित समाजसेवक डॉक्टर विचारवंतांचा सन्मान करण्यासाठी यात्रेचे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रसंतांची कर्मभूमी असलेल्या भक्तिस्थळापासून ते महात्मा बसवेश्वरांची कर्मभूमी असलेल्या शक्ती स्थळ मंगळवेढा पर्यंत ही सन्मान यात्रा जाणार आहे. दि.५ सप्टेंबर रोज गुरुवारी दु.३ वा. या यात्रेचा आरंभ राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या भक्ती स्थळावरून आरंभ होणार आहे. ही यात्रा अहमदपूर-चाकूर-लातूर-निलंगा-औसा-तुळजापूर-सोलापूर-जत -कवठेमहांकाळ-कोल्हापूर-सांगली-पुणे-नगर-बारामती पंढरपूर-मार्गे मंगळवेढा येथे दि.२१ सप्टेंबर रोजी समापण होणार आहे.

या सन्मान यात्रेच्या शुभारंभ राष्ट्रसंतांची उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या व आचार्य गुरुराज स्वामी महाराजांच्या शुभहस्ते होणार आहे. या यात्रेचे नेतृत्व खा.डॉ. अजित गोपछडे करणार असून यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन साब महाजन, शिवानंद हेगणे, राजकुमार मजगे, बालाजी पाटील चाकुरकर, प्रताप पाटील, ओम भाऊ पुणे, शिवकुमार उटगे, राजकुमार कल्याण, निखिल कासनाळे, प्रशांत बिब्राळे, शंकर भुरे पाटील, संभाजी पाटील चाकूरकर, रवी महाजन, ओंकार पुणे, संदीप चौधरी, गणेश शेटकर, अनिल कासनाले, राजकुमार कल्याणी, प्रा.विश्वंभर स्वामी यांनी केले आहे.

# एमटीपीकॉन २०२४ राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनाने लातूरच्या वैद्यकीय क्षेत्राचा बहुमान : आ. अमित देशमुख

**लातूर/प्रतिनिधी**

लातूरमध्ये दुसऱ्या राष्ट्रीय पातळीवरील एमटीपीकॉन २०२४ परिषदेचे आयोजन करून भारतीय स्त्री रोग संघटनेने लातूरच्या वैद्यकीय क्षेत्राचा बहुमान केला आहे. आपल्या दर्जेदार वैद्यकीय सेवा सुविधांमुळे येथील सर्वच स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर या बहुमानाचे मानकरी असल्याचे प्रतिपादन माजी पालकमंत्री आ. अमित देशमुख यांनी केले.

लातूरच्या ग्रँड सरोवर हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन आ. अमित देशमुख यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खा. डॉ. शिवाजी काळगे, स्त्री रोग तज्ञ संघटनेच्या राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. माधुरी पटेल, डॉ. राजेंद्रसिंह




परदेशी, डॉ. अजय माने, डॉ. गिरीश माने, डॉ.प्रियांकूर रॉय, डॉ. कानन येळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे स्त्रीरोग तज्ञ संघटनेचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. कल्याण बरमदे, संयोजन समितीच्या अध्यक्षा डॉ. स्वाती गोरे, सचिव डॉ. रचना जाजू, डॉ. राखी सारडा,डॉ. जाकिरा केळगावकर, लातूर स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा पाटील, सचिव डॉ. मनिषा बरमदे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना आ. अमित देशमुख यांनी लातूरच्या सामान्य नागरीकांच्या मनात वैद्यकीय क्षेत्र आणि डॉक्टरांबद्दल आदराचे स्थान आहे म्हणूनच त्यांनी डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून दिल्लीला पाठवल्याचा आवर्जून उल्लेख केला. आजघडीला अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध विकारांच्या तज्ञ डॉक्टरांमुळे रूग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधेचा लाभ मिळतोय. लातूरमध्ये आजमितीस सर्वच आजारांवर अन्य महानगरांच्या तुलनेत उत्कृष्ट आरोग्य सेवा - सुविधा उपलब्ध आहेत. गर्भपात व त्यासंबंधी निगडीत विषयाच्या एमटीपीकॉन परिषदेमुळे महिलांच्या आरोग्याच्या बाबतीत अद्यावत तंत्रज्ञान, नवीन प्रगती, उपचार प्रणालींवरमार्गदर्शन, मथन होणार आहे असे त्यांनी सांगितले.

# श्री संत सेना महाराज जयंतीनिमित्त महाप्रसाद

**मुदखेड/ता.प्रतिनिधी**

मुदखेड येथे दि.३१ऑगस्ट रोजी श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन नाभिक बांधवांच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी उध्दझ मारोतराव गायकवाड, कॉंग्रेसचे शहरध्यक्ष कैलास गोडसे, भाजपचे जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, शिवसेना उबाठा गटाचे विश्वभर पवार, बाळासाहेब देशमुख बारडकर, माजी नगरसेवक संजय आऊलवार, शिवसेना शहर प्रमुख सचिन चंद्रे, ओबीसी नेते नागोराव शेंडगे यांनी संत सेना महाराज यांना अभिवादन केले. तसेच नागनाथ घिसेवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी नाभिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता चापलकर, जिल्हा कोषाध्यक्ष बाळू गायकवाड, धोंडिबा महादवाड, सदाशिव पा. पुयड,राष्ट्रवादी पक्षाचे शहरध्यक्ष महमद बुऱ्हान,राष्ट्रवादी महिला आघाडी शहरध्यक्ष रुक्मिनबाई कुंचटवाड, शिवानंद देवके, प्रकाश पा.सूर्यवंशी, संतोष बोडके, दत्ता सोनटक्के, संतोष गायकवाड, बाबुराव गायकवाड, दत्ता गायकवाड, प्रल्हाद गायकवाड, शंकर गायकवाड, नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष गंगाधर कुंचटवाड, संदीप मुखेडे, बालाजी शहापुरे, सुनील गायकवाड, शिवाजी गायकवाड, परमेश्वर गायकवाड, माधव कोंडामंगल, बालाजी कोंडामंगल, शिवा खुळे, ज्ञानेश्वर गायकवाड, शंकर मोतेवार,शिवा पांगरगावकर, योगेश उत्तमपल्ले, ऋषिकेश शिंगारे, रघुनाथ जामलवाड, माधव गायकवाड, यासह आदींची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व नाभिक बांधवांनी परिश्रम घेतला होता.

# पर्युषण पर्वात कत्तलखाने बंद ठेवा

## सकल जैन समाजाद्वारे जिल्हा प्रशासनास साकडे

**परभणी/प्रतिनिधी**

जैन धर्मियांचे पर्युषण पर्व महोत्सवानिमित्त या जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने दहा दिवस बंद ठेवावेत, अशी मागणी सकल जैन समाजाने महानगरपालिका आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली.

संपूर्ण राज्यात जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने बंद ठेवण्या संदर्भात शासनाचे स्पष्ट आदेश जारी झाले आहेत. परंतु, परभणी जिल्ह्यात या अनुषंगाने प्रशासनाने ३ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर या दहा दिवसात कत्तलखाने बंद करण्या संदर्भात आदेश निर्गमित केलेले नाहीत. त्यामुळे परभणी जिल्ह्यात संपूर्णपणे कत्तलखाने बंद राखणे हे नितांत गरजेचे आहे. त्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने हालचाली कराव्यात, अशी मागणी सकल जैन समाजाचे नितेश जैन झांबड, नरेंद्र मुथा, श्रीकांत अंबुरे जैन, अभिजित संघई, डॉ.बाहुबली लिंबाळकर आदींनी केली आहे.

# भोकर तालुक्यात पोहण्यास गेलेले दोन तरूण पुरात वाहुन गेले

**भोकर/ता.प्रतिनिधी**





तालुक्यात शनिवार दि.३१ऑगस्ट पासून मुसळधार पाऊस पडत असल्याने नद्या नाल्याना पूर आला असून दि.३ सप्टेंबर २४ रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास सुधा नदीच्या पुरात मौ. रेणापूर ता.भोकर येथील दोन तरूण हुलडबाजी करीत पोहण्यास गेले पुराचा प्रवाह जोमाने असल्याने दोन्ही तरूण वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

भोकर तालुक्यात गेल्या पाच दिवसापासून संततधार पर्जन्यवृष्टी होत असून पावसाचा जोर अद्यापही कायम असल्याने परिसरातील अनेक नदी नाले विहिरी तलाव तुडूंब भरले आहेत. मंगळवार पर्यंत एकुण पाऊसाची सरासरी ६८२.८० मि.मी नोंद झाली आहे. भोकर तालुक्यात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी तालुक्यातील नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला असतानाही शनिवारी दि.३ मौजे रेनापुर येथील पाच तरुण सुधा नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेले होते. त्याना पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने त्यातील श्रीनिवास भरत मुळेकर वय १८,आणि यश संदीप भगत वय १९ हे दोघे तरुण पुरात वाहून गेले आहेत. हे दोघे ही तरुण आपल्या आई-वडिलांना एकूलते एक होते. बाकी तिघेजण परिस्थिती पाहुन नदीपात्रात न उतरल्याने ते बालंबाल बचावले आहेत.बचावलेल्या तिघांनी आरडाओरड करून लोकांना मदतीची हाक दिली.लोकधावून येई पर्यंत पाण्याच्या प्रवाहात हे दोघेही पाण्याच्या जोराच्या लाटेत अदृश्य झाले आहेत.या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच भोकरचे तहसीलदार सुरेश घोळवे हे महसूल कर्मचाऱ्यासह घटनास्थळी धाव घेऊन शोध मोहिमेचे कार्य जोमाने सुरू केले आहे.या बचाव कार्यात रेनापुर तसेच कोळगाव नांदा,दिवशी ,गारगोट वाडी परिस्थितील नागरिक मदत कार्य करीत आहेत.परंतू सांयकाळ पर्यंत दोनही तरुणाचा शोध लागलेला नाही या हृदय द्रावक घटनेमुळे भोकर तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.घटनास्थळी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब रावणगावकर,सुभाष पा.किन्हाळकर, सुरेश बिलेवाड,सुभाष पा.कोळगावकर, सपोनी एस.एन. औटे,पोलिस कर्मचारी परमेश्वर गाडेकर,प्रकाश वाळवे आदिसह अनेकांनी भेटी दिल्या आहेत.

# मराठवाडा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन

**परभणी/प्रतिनिधी**

दिवसभर कधी रिमझीम तर कधी धो धो बरसणार्या जलधारा, त्यात जून्या आठवणींना उजाळात देत उडणारे हास्याचे फवारे आणि निसर्गरम्य वातावरणात गप्पागोष्टी, नाचगाण्यात मराठवाडा हायस्कूल खंडोबा बाजारच्या १९८७ च्या बॅचच्या दहावीच्या वर्गमित्रांच्या मैत्रीचा उत्सव पार पडला.



रविवार १ सप्टेंबर रोजी माजी विद्यार्थ्यांचा हा स्नेहमिलन सोहळा पार पडला. सकाळी १० वाजता शाळेत प्रार्थना झाली. त्यानंतर गुरुजण संस्थाध्यक्ष विजय जोशी, अनिल अष्टूरकर, भास्करराव ब्रम्हनाथकर, के.एस. सुरवसे आदीच्या उपस्थित स्वागत समारोह पार पडला. माजी विद्यार्थ्यांच्यावतीने गुरुजनांचे स्वागत करुन त्यांना वंदन केले. सर्व विद्यार्थ्यांनी एकमेकांचा अल्पपरिचय करुन दिला. तब्बल ३७ वर्षानंतर सर्व वर्गमित्र एकत्र आले होते. त्यामुळे अनेकांच्या चेहर्यात बदल दिसून येत होता. प्रत्येक जण एकमेकांची गळाभेट घेत गप्पागोष्टी करत होते. त्यानंतर दुपारी १ वाजता पाथरी रोडवरील सरदेशपांडे हुर्डा पार्टी फार्महाऊसवर मुख्य कार्यक्रम घेण्यात आला. दिवसभर पावसाची रिपरिप सुरु होती. मात्र मैत्रीच्या फुटलेल्या बांधावर त्याचा कुठेही परिणाम झाला नाही. पावसाळी वातावरणात सांस्कृतिक कार्यक्रम सुरु झाला. आपण पन्नाशी पार केली, हे सारेच जण विसरुन गेले आणि गाण्याच्या तालावर ठेका धरु लागले. यात विद्यार्थिनीही कुठेच कमी पडत नव्हत्या. विशेषत: सुनिता अग्रवाल, सुनिता वानखेडे यांनी सादर केलेल्या ये गलियॉ ये चौबारा, यहॉं आना दोबारा या गाण्यावर केलेले नृत्य वन्समोअरची दाद देऊन गेले. चंद्रकला लंगोटे घेतला उखाणाही दाद मिळवून गेला.सुनिता आढाव आणि डॉ. संजय हरबडे यांनी सादर केलेल्या युगल गीताने कार्यक्रमात रंगत आणली. सुधीर सहजराव, मदन ठाकूर यांनी सादर केलेल्या गजल आणि दत्ता तरडे याचे मै हू डॉन गाण्यावरील नृत्य लक्षवेधी ठरले. पावसाचा जसजसा जोर वाढत होता, तसा विद्यार्थ्यांचा जोश वाढत होता. सोबत गरम भजे, पुरणपोळी, भाकर, ठेचा, चहा, पाणीपुरी अशी मिष्टान्नाची रेलचेल सोबतीला होती. कार्यकम समारोपाकडे जात असताना मात्र अनेकांच्या मनात हुरहूर सुरु झाली. प्रत्येक जण तो आनंदी क्षण आपल्या मोबाईलमध्ये वैद करत होता. एकमेकांचे नंबर, फोटो शेअर करत होते. अखेर झिंगाट गाण्यावर सर्वांनी मनसोक्त डान्स करुन मैत्रीचा हा ऋणाबंध जोपासत पुन्हा भेटण्याचा संकल्प करत एकमेकांचा निरोप घेतला. सुत्रसंचालन डॉ. हरबडे यांनी तर आभार रणजीत काकडे यांनी मानले. या स्नेहमिलन मेळाव्यासाठी डॉ.संजय हरबडे, सखाराम टेकुळे, सुनिता वानखेडे, चंद्रकला लंगोटे, रणजीत काकडे, यशवंत वाघमारे आदींनी नियोजन केले होते.

### मैत्रीचे ऋणानुबंध कायम ठेवा

परभणी शहरात इतरही शाळा होत्या. मात्र सर्वसामान्य, गरिब कुटूंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने एनव्हीएस संस्थेने मराठवाडा हायस्कूलचे रोपटे लावले. आज या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले. आज तुम्हा विद्यार्थ्यांची झालेली प्रगती हेच गुरुजनांचं समाधान असते. इतक्या नंतर तुम्ही एकत्र आलात, असेच यापुढेही एकमेकांच्या संपर्कात रहा, सुखदु;खात सहभागी होत मैत्रीचे हे ऋणाबंध काम ठेवा, असे संस्था सचिव विजय जोशी यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सांगितले.

# आझाद मैदानावर बुधवारी 'न्यायालयीन आयोग दो आंदोलन'

## सकल मातंग समाज समन्वय समितीकडून आयोजन

**परभणी/प्रतिनिधी**

अनुसूचित जाती आरक्षणामध्ये वर्गीकरण करण्यासाठी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली न्यायालयीन आयोग स्थापन करून अंमलबजावणी करावी या मागणीसाठी सकल मातंग समाज समन्वय समितीच्या वतीने दिनाक ४ सप्टेंबर रोजी आझाद मैदान, मुंबई येथे न्यायालयीन आयोग दो आंदोलन करण्यात येणार आहे.

सकल मातंग समाज समन्वय समितीच्या वतीने याबाबत राज्याचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. अनुसूचित जाती-जमातीसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ काही ठराविक जातीना मिळत असून, त्या अनुसूची मधील इतर जाती आरक्षणापासून वंचित राहात असल्यामुळे आरक्षणामध्ये वर्गीकरण करणे गरजेचे आहे.

अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षण वर्गीकरणासाठी यापुढे कुठल्याही जातीची अभ्यास समिती स्थापन करून वेळकाढूपणा करू नये तर उच्च न्यायालयाचे सेवा निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास आयोग स्थापन करावा आणि त्या आयोगावर अनुसूचित जाती-जमातीमधील कोणत्याही जातीचा प्रतिनिधी असणार नाही याची दक्षता घ्यावी. जेणे करून आयोगावर जातीयतेचा शिक्का बसणार नाही. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन करून आयोगाने दोन महिन्यात आपला अहवाल सादर करण्याचा कालबध्द कृती कार्यक्रम आखून द्यावा. अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था तात्काळ कार्यान्वीत करावी आणि 'आर्टी' साठी दहा हजार कोटी रूपयाची तरतूद करून मातंग जात समुहातील पहिली पासून शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शिष्यवृती लागू करावी यासह इतर मागण्यांसाठी दिनांक: ४ सप्टेंबर रोजी रोजी सकाळी ११ वाजल्यापासून न्यायालयीन आयोग दो आंदोलन केले जाणार आहे. सरकारने या मागण्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी तात्काळ प्रशासकीय बैठक आयोजित करावी आणि आंदोलनातील प्रतिनीधी मंडळासोबत चर्चा करून निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी सचिन साठे, कॉ. गणपत भिसे, रणधीर कांबळे, शंकर तडाखे, सचिन बगाडे, दिलीपकुमार गायकवाड, डॉ. संजय गायकवाड, डॉ. दयाराम मस्के, डॉ. भगवानराव वाघमारे आदीसह कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# कृषीसह संलग्न अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरीची प्रक्रिया ५ सप्टेंबरपर्यंत

**परभणी/प्रतिनिधी**

कृषी आणि संलग्न अभ्यासक्रमाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत केंद्रनिहाय (जागेवरील प्रवेश) प्रवेश फेरीची प्रक्रिया सुरू असून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया केंद्रास विद्यापीठाचे कुलगुरू यांनी भेट दिली.

यावेळी सहयोगी अधिष्ठाता तथा प्रवेश प्रक्रिया समिती अध्यक्ष डॉ. सय्यद इस्माईल, सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेश कदम, प्रवेश प्रक्रिया समितीचे सदस्य सचिव डॉ. डी.के. झाटे आदींची उपस्थिती होती.

कृषी आणि संलग्न शिक्षण आपल्या विभागाच्या आणि एकूणच देशाच्या समग्र विकासासाठी आणि शाश्वत कृषी विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. म्हणून प्रवेशासाठी आलेल्या तसेच अंतिम यादीतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना कृषी व संलग्न अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी केले.

या सर्व अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दिनांक ३० ऑगस्टपासून सुरू असून केंद्रीभूत केंद्रनिहाय (जागेवरील प्रवेश) प्रवेश फेरीचा प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा द्वारे शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ मध्ये कृषी व कृषी संलग्न अभ्यासक्रमासाठी प्रकाशित अंतिम गुणवत्ता यादीमध्ये आपले नाव असणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी विद्यापीठाचे पदवी प्रवेश केंद्र कृषी महाविद्यालय परभणी येथे परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातील तर कृषी महाविद्यालय लातूर येथे लातूर, बीड व धाराशिव या जिल्ह्यातील तसेच कृषी महाविद्यालय बदनापूर येथे जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व घटक व विनाअनुदानित महाविद्यालयांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश फेरी राबविली जात आहे. याकरिता दिनांक ३ सप्टेंबर रोजी ३५ व त्यापेक्षा अधिक पर्सेंटाइल (इतर अधिभारासह) तर दिनांक ४ सप्टेंबर रोजी सर्व पात्र उमेदवार आणि दिनांक ५ सप्टेंबर रोजी सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) यांना बोलावले आहे. उमेदवारांनी https://agri2024.mahacet.org या संकेतस्थळावर भेट देऊन शाखानिहाय व महाविद्यालयनिहाय रिक्त जागांचा तपशील पहावा आणि संबंधित महाविद्यालयाच्या जिल्ह्याच्या केंद्रामध्ये दिनांक ३, ४ आणि ५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत नोंदणी करून प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे व आपला प्रवेश निश्चित करावा असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी केले आहे.

# भारतीय तटरक्षक दलाचं हेलिकॉप्टर अरबी समुद्रात कोसळलं, दोन पायलटसह तीन जण बेपत्ता

मुंबई /प्रतिनिधी




भारतीय तटरक्षक दलाच्या एका हेलिकॉप्टरचा मोठा अपघात झाला आहे. गुजरातमधील पोरबंदरजवळ अरबी समुद्रात मदतीसाठी गेलेलं हे हलिकॉप्टर समुद्रात कोसळलं आहे. या दुर्घटनेनंतर हेलिकॉप्टरचे दोन्ही पायलट व एक डायव्हर बेपत्ता आहे. या हेलिकॉप्टरमध्ये चार जण होते. त्यापैकी एका व्यक्तीला (डायव्हर) बचाव पथकाने वाचवलं आहे. दरम्यान, अरबी समुद्रात हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले आहेत.

अरबी समुद्रात एक जहाज अडकलं होतं. त्यामुळे जहाजातील कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी तटरक्षक दलाला संदेश पाठवला. तटरक्षक दलाने या जहजावरील लोकांच्या मदतीसाठी एक हेलिकॉप्टर पाठवलं होतं. या हेलिकॉप्टरमध्ये दोन पायलट व दोन डायव्हर्स होते. मात्र हे हेलिकॉप्टर जहाजापर्यंत पोहोचायच्या आधीच समुद्रात कोसळलं. हेलिकॉप्टरमधील दोन्ही पायलट व एक डायव्हर बेपत्ता आहे. तर एका डायव्हरला बचाव पथकाने वाचवलं आहे. त्याची प्रकृती आता स्थिर आहे. पायलट्सना शोधण्यासाठी तटरक्षक दलाने शोहमोहीम हाती घेतली आहे. यासाठी चार जहाजं व दोन विमानं पाठवण्यात आली आहेत. तिघेही लवकरच सापडतील असा विश्वास तटरक्षक दलाने व्यक्त केला आहे.भारतीय तटरक्षक दलाने या घटनेनंतर एक निवदेन जारी केलं आहे. यामध्ये म्हटलं आहे की इंडियन कोस्ट गार्डच्या एका अॅडव्हान्स्ड लाईट हेलिकॉप्टरने अलीकडेच गुजरातमध्ये वादळ आलं तेव्हा ६७ लोकांजा जीव वाचवला होता. तेच हेलिकॉप्टर सोमवारी रात्री ११ वाजता अरबी समुद्रात अडकलेल्या एका जहाजावरील लोकांच्या मदतीसाठी पाठवण्यात आलं होतं. भारतीय झेंडा असलेल्या हरी लीला या जहाजावरील जखमी क्रू मेंबर्सच्या मदतीसाठी हे हेलिकॉप्टर पाठवण्यात आलं होतं. मात्र, पोरबंदर किनाऱ्यापासून ४५ किमी दूर अरबी समुद्रात ते अपघातग्रस्त झालं आहे.

**हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले**

तटरक्षक दलाने त्यांच्या निवेदनात म्हटलं आहे की हेलिकॉप्टरमध्ये चार जण होते. बचाव मोहिमेदरम्यान तातडीने हेलिकॉप्टरचं लँडिंग करावं लागलं. हेलिकॉप्टरमधील एका डायव्हरला वाचवण्यात आम्हाला यश मिळालं आहे. उर्वरित तीन जणांचा शोध घेतला जात आहे. तसेच हेलिकॉप्टरचे अवशेषही सापडले आहेत. जिथे हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले त्याच्या आसपास शोधमोहीम सुरू आहे.

**गुजरातमध्ये तटरक्षक दलाची बचाव मोहीम**

गुजरातमध्ये सध्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस चालू आहे. त्यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. याचदरम्यान, पोरबंदर किनाऱ्याजवळ भारतीय तटरक्षक दलाने एक बचाव मोहीम हाती घेतली होती. तटरक्षक दलाने मुसळधार पावसात व पुरात अडकलेल्या ६० जणांना वाचवलं आहे.

## सांधेदुखीमुळे सायना नेहवाल निवृत्तीच्या विचारात

नवी दिल्ली /वृत्तसंस्था



भारताची ऑलिम्पिक कांस्य पदकविजेती बॅडमिंटनपटू सायना नेहवालने तिच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची माहिती शेअर केली आहे. भारताच्या या अव्वल बॅडमिंटनपटूला सांधेदुखीचा त्रास होत आहे. त्यामुळे तिला या वर्षीच्या अखेरपर्यंत तिच्या बॅडमिंटनमधील भविष्याबाबतचा निर्णय घ्यावा लागेल. आजारपणामुळे तिला सराव करणं कठीण झालं आहे. सायना नेहवाल ही बॅडमिंटनमध्ये भारतासाठी ऑलिम्पिक पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला खेळाडू आहे. तिने लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत भारतासाठी कांस्यपदक जिंकलं होतं. तिने आतापर्यंत तीन वेळा ऑलिम्पिकमध्ये भारताचं प्रतिनिधित्त्व केलं आहे. मात्र आता सांधेदुखीच्या त्रासामुळे ती निवृत्तीच्या विचारात आहे.राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०१० व २०१८ मध्ये तिने बॅडमिंटनच्या महिला एकेरी स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं होतं. सायनाची बॅडमिंटनमधील कारकीर्द अंतिम टप्प्यात आहे. यावर तिनेही एका मुलाखतीत भाष्य केलं आहे. ऑलिम्पिक पदक विजेता भारतीय नेमबाज गगन नारंग याचा पॉडकास्ट 'हाऊस ऑफ ग्लोरी' या पॉडकास्टमध्ये सायना म्हणाली, माझ्या गुडघ्याची अवस्था फार चांगली नाहीये. मला संधिवात आहे. त्यामुळे मला आठ ते नऊ तास खेळणं, सराव करणं शक्य होत नाही. सायना म्हणाली, संधिवाताचा त्रास असताना तुम्ही जगातल्या सर्वोत्कृष्ट खेळाडूंना आव्हान कसं देणार? तुम्ही त्यांच्यासमोर कसे टिकणार? मला आज ना उद्या ही गोष्ट स्वीकारावी लागेल. कारण जगातील अव्वल दर्जाच्या खेळाडूंविरोधात खेळण्यासाठी केवळ एक ते दोन तास सराव करून चालणार नाही. रोज आठ ते नऊ तास द्यावे लागतील, जे सांधेदुखीमुळे शक्य नाही. मी निवृत्ती घेतल्यानंतर काय होईल याचाही मी विचार करतेय. मात्र मला पुढे जे वाढून ठेवलंय ते स्वीकारावं लागेल.भारतीय बॅडमिंटनची फुलराणी अशी ओळख असलेली सायना नेहवाल ही भारतीय जनता पार्टीची सदस्य आहे. ती गेल्या वर्षभरापासून आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपासून दूर आहे. गेल्या वर्षी सिंगापूर ओपनमध्ये ती शेवटची बॅटमिंटन कोर्टवर दिसली होती. त्या स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत सायनाचं आव्हान संपुष्टात आलं होतं. 'फुलराणी' म्हणाली, मी सध्या निवृत्ती घेण्याच्या विचारात आहे. हा निर्णय खूप वेदनादायी असेल, कारण हे एखाद्या नोकरी करणाऱ्या सामान्य व्यक्तीसारखं आहे. मला कल्पना आहे की एका खेळाडूची कारकीर्द लहान असते. त्यामुळे मी काही गोष्टींची मानसिक तयारी करत आहे.

पान एकवरून –

## विनायक मेटेंच्या शिवसंग्राममध्ये

स्मारक समुद्रामध्ये उभारावे, मराठा समाजाला टिकणारे आरक्षण द्यावे, शेतकरी वाचविण्यासाठी संपूर्ण कर्जमाफी करावी, वाढत्या भ्रष्टाचाराला आळा घालावा, यासाठी संघटनेच्या माध्यमातून आम्ही लढणार आहोत. किल्ले रायगडावरील जगदीश्वराच्या मंदिराची होत असलेली पडझड थांबवण्यासाठी मंदिराची डागडुजी अथवा जीर्णोद्धार करण्यात यावा. कंत्राटी भरती थांबवून कायमस्वरूपी भरती करावी. सारथी संस्थेची व्याप्ती वाढवून सर्व विभागांत काम सुरू करावे. महिलांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी कायमस्वरूपाच्या योजना आखाव्यात. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाने थेट कर्ज योजना सुरू करावी, अशा प्रकारची भूमिका घेऊन स्वराज्य संग्राम संघटना सर्वदूर कार्यरत राहणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. स्वराज्य संग्राम संघटनेचे पहिले अधिवेशन पंढरपूरला १५ सप्टेंबर रोजी होणार असून, त्यासाठी राज्यभरातून कार्यकर्ते येतील. आणि त्यात संघटनेची पुढील भूमिका जाहीर करणार असल्याचे तानाजी शिंदे यांनी सांगितले.

## पाकिस्तान चारीमुंड्या चीतपट

हे दोघेही बाद झाल्यावर मुशफिकुर रहीम आणि माजी कर्णधार शकीब अल हसन यांनी अनुक्रमे नाबाद २२ आणि नाबाद २१ धावांची खेळी खेळून बांगलादेशच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. बांगलादेशने ५६ षटकांत ४ गडी गमावून १८५ धावा करत लक्ष्य गाठले.पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली गेली. या मालिकेतील पहिला सामना बांगलादेश संघाने जिंकला होता. पहिला सामना बांगलादेशने १० गडी राखून जिंकला होता. मालिकेतील दुसऱ्या सामन्यातही बांगलादेश संघाने चांगली कामगिरी केली. दरम्यान, रावळपिंडीत खेळल्या जाणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यात बांगलादेश संघाने एक मोठा विक्रम केला आहे.बांगलादेश संघाने दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात पाकिस्तानला ऑलआऊट केलं. बांगलादेशच्या वेगवान गोलंदाजांनी या सर्व १० विकेट्स घेतल्या. फिरकी गोलंदाजांनीही यात योगदान दिले. बांगलादेशच्या तस्किन अहमद, हसन महमूद आणि नाहिद राणा यांनी पाकिस्तानविरुद्ध विकेट घेतल्या. या तिन्ही गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. यादरम्यान हसन महमूदने पाच विकेट घेतल्या. नाहिद राणाने चार आणि तस्किन अहमदने एक विकेट घेतली.

## बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास

प्रकरणाचा तपास अहवाल २१ दिवसांच्या आत आला पाहिजे अशीही तरतूद करण्यात आली आहे. जर २१ दिवसांत तपास पूर्ण झाला नाही तर तपास पूर्ण करण्यासाठी आणखी १५ दिवसांची मुदतच वाढवून मिळेल. या १५ दिवसांच्या कालावधीत जो तपास केला जाईल तो पोलीस अधीक्षक आणि त्यावरच्या पदावरचे अधिकारी यांच्या नेतृत्वातच केला जाईल. अशा तरतुदी या विधेयकात आहेत.

**अपराजिता टास्क फोर्सचं काम पूर्वीप्रमाणेच सुरु राहणार**

या विधेयकात बलात्काराचे खटले फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. महिला किंवा लहान मुलांवर अन्याय झाला, त्यांचं लैंगिक शोषण, बलात्कार हे झालं तर त्यांना लवकरात लवकर न्याय मिळाला पाहिजे या अनुषंगाने हे विधेयक आणण्यात आलं आहे. तसंच अशा प्रकारच्या घटनांची चौकशी करण्यासाठी अपराजिता टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली आहे जी या प्रकारच्या प्रकरणांवर काम करते. या टास्क फोर्सचं काम पूर्वीप्रमाणे सुरु राहणार आहे असंही स्पष्ट करण्यात आलं आहे. कोलकाता येथील डॉक्टर महिलेवर ९ ऑगस्टच्या दिवशी बलात्कार करण्यात आला आणि त्यानंतर तिची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. या घटनेनंतर डॉक्टरांनी आंदोलनही केलं. तसंच आरोपी संजय रॉयला फाशी द्या अशीही मागणी केली. आता या प्रकरणाचे पडसाद देशभरात उमटल्यानंतर हे विधेयक पश्चिम बंगाल सरकारने आणलं जे आता मंजूर करण्यात आलं आहे.

## महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा

यांची नावे आरोपी म्हणून समोर आली आहेत.सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक, बार्शीतील बंद असलेल्या आदित्यराज साखर कारखान्याचे प्रमुख अरुण सुबराव कापसे यांच्याबाबत हे प्रकरण घडले आहे. कापसे पिता-पुत्र २८ ऑगस्ट रोजी सोलापुरात कामानिमित्त आले असता एका महिलेने त्यांची मदतीसाठी भेट घेतली होती. काही दिवसांनंतर तिने भ्रमणध्वनीद्वारे कापसे यांच्याशी संपर्क करत तुमच्याविरुद्ध महिला अत्याचाराची तक्रार असल्याचे सांगत धमकावण्यास, तसेच खंडणी मागण्यास सुरुवात केली.दरम्यान, यातून एक लाख लुटल्यावर आणखी १५ लाख रुपये देण्याची मागणी करण्यात आली. अखेर याप्रकरणी त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली असून, कापसे यांनी संबंधित महिला आणि तिचा साथीदारासह त्यांचे राजकीय विरोधक अनिल डिसले यांचाही हात असल्याचे सांगून त्यांच्याविरुद्ध तक्रार दिली आहे.

# स्वेच्छानिवृत्त मंत्रालयीन अधिकाऱ्याच्या हाती शिवबंधन मेहकर विधानसभेसाठी सिद्धार्थ खरात ठाकरे गटात

बुलढाणा /प्रतिनिधी




निवृत्त सरकारी अधिकाऱ्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा झेंडा हाती घेतला आहे. स्वेच्छानिवृत्त मंत्रालयीन सहसचिव सिद्धार्थ खरात यांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात खरात उतरणार आहेत. उद्धव ठाकरेंच्या हस्ते मातोश्री निवासस्थानी खरातांनी शिवबंधन बांधले. महाविकास आघाडीसाठी आजचा दिवस इन्कमिंगचा ठरला असून याआधी भाजप नेते समरजीतसिंह घाटगे यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे.

सिद्धार्थ खरात हे मंत्रालयीन सहसचिव असताना त्यांनी एक जुलै रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यानंतर आता त्यांनी राजकारणात येण्याचा मार्ग स्वीकारला आहे. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आज मातोश्री या ठिकाणी दुपारी एक वाजता सिद्धार्थ खरात यांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे.

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर विधानसभा मतदारसंघातून ठाकरेंच्या शिवसेने कडून निवडणूक लढवण्यास सिद्धार्थ खरात हे इच्छुक असल्याची माहिती आहे.सिद्धार्थ खरात यांनी उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, ग्राम विकास विभाग, गृह विभागामध्ये सहसचिव म्हणून काम केले आहे. राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री आणि केंद्रीय राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव म्हणूनही सिद्धार्थ खरात यांनी कामे केली आहेत.याशिवाय गृह, तुरूंग, उत्पादन शुल्क, शालेय शिक्षण, महसूल, पणन, कामगार, पशुसंवर्धन, दुग्ध, मत्स्यव्यवसाय, जलसंधारण, रोजगार हमी योजना, ऊर्जा आणि बंदरे यासारख्या विभागांच्या मंत्रीमहोदयांकडे विशेष कार्य अधिकारी / खाजगी सचिव म्हणूनही खरातांनी काम केले आहे.

सहसचिव गृहविभाग मंत्रालय मुंबई येथून आपली ३० वर्षांची प्रदीर्घ प्रशासकीय सेवा पूर्ण केल्यानंतर एक जुलै २०२४ रोजी सिद्धार्थ खरात यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली आहे. त्यामुळे बुलढाणा गोवर्धन सभागृह, बुलढाणा अर्बनसमोर कारंजा चौक येथे त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचा 'सेवागौरव सोहळा' आयोजित करण्यात आला होता.

# महाराष्ट्राच्या भाग्यश्रीने मनं जिंकली, कोमामधून बाहेर येऊन पॅरालिम्पिक गाठलं

पॅरिस /वृत्तसंस्था




महाराष्ट्राच्या भाग्यश्री जाधववर सर्वांच्या नजरा लागलेल्या होत्या. कारण भाग्यश्रीकडून थाळी फेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत यावेळी भारताला सुवर्ण पदकाची आशा होती. भाग्यश्रीने सुरुवात चांगली केली होती. त्यामुळे ती आता पदक पटकावणार का, यावर सर्वांच्या नजरा लागलेल्या होत्या. पण भाग्यश्रीला यावेळी पदक जिंकता आले नसले तरी तिने सर्वांची मनं मात्र जिंकली. कारण भाग्यश्रीवर जेव्हा विषप्रयोग झाला, तेव्हा ती कोमामध्ये गेली होती. कोमामधून बाहेर आल्यावर तिने संघर्ष केला आणि थेट पॅरिस गाठलं. त्यामुळे तिच्या या संघर्षाला सर्वांनीच सलाम केला.भाग्यश्री ही नांदेडची. लहानपणापासून तिने संघर्ष केला. वडील मतिमंद असल्यामुळे तिला काकांनी वाढवले. तिचे लग्न करून दिले. पण लग्नानंतर तिच्यावर विषप्रयोग करण्यात आला. त्यामुळे ती कोमात गेली. कायमचं अपंगत्व आलं. पण तिने हार मानली नाही. भाग्यश्री संघर्ष करत पॅरिसमधील पॅरालिम्पिकपर्यंत पोहोचली. चीनमधील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तिने दोन कांस्यपदकं जिंकली होती. त्यामुळे पॅरालिम्पिकमध्ये तिची निवड करण्यात आली. भाग्यश्रीचा सराव चांगला सुरु होता. त्यामुळे तिच्याकडून सुवर्णपदकाची आशा चाहत्यांना होती.भाग्यश्रीने जेव्हा सुरुवात केली. तेव्हा ती दुसऱ्या स्थानावर होती. त्यानंतर तिची तिसऱ्या स्थानावर घसरण झाली. तरीही तिला पदकाची आस होती. कारण तिला कांस्यपदक जिंकता आले असते. पण त्यानंतर काही वेळातच ती चौथ्या क्रमांकावर गेली आणि भारताच्या हातून पदक निसटल्याचे पाहायला मिळाले. भाग्यश्री निराश झाली असली तरी तिचा हा संघर्ष या निमित्ताने जगासमोर आला.भारताने यापूर्वी तीन सुवर्णपदकं जिंकली होती. यामधील पहिले गोल्ड मेडल भारताला नेमबाजीत अवनी लेखराने मिळवून दिले होते. भारताला दुसरे गोल्ड मेडल मिळाले ते बॅडमिंटनमध्ये. भारताच्या नितेश कुमारने मंगळवारी बॅडमिंटनमध्ये सुवर्णपदकाला गवसणी घातली. भारताला तिसरे सुवर्णपदक मिळाले ते भाला फेक स्पर्धेत. भारताला भाला फेक स्पर्धेत तिसरे सुवर्णपदक मिळवून दिले ते सुमीत अंतिलने. सुमीतने पॅरालिम्पिकमधील विक्रम मोडला आणि भारताला तिसरे गोल्ड मेडल जिंकवून दिले होते. भारताचे हे एकूण १४ वे पदक ठरले होते.

# पत्नीच्या नावे भरले लाडकी बहिण योजनेचे ३० अर्ज

सातारा /प्रतिनिधी




राज्यभरात लाखो महिलांना सरकारच्या लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतला आहे. रक्षाबंधनाआधीच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मानधन एकत्रितरित्या बँक खात्यावर जमा झाले आहेत. २ महिन्यांचे ३००० रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झाले आहेत. अजूनही अनेक महिला या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करत आहेत. नवी मुंबईत मात्र एक विचित्र प्रकार समोर आला आहे. एका व्यक्तीने आपल्या पत्नीच्या नावे लाडकी बहिण योजनेचे ३० अर्ज भरले आहत. मात्र, एका नंबरमुळे तो फसला आहे. लाडकी बहीण योजनेत एका भामट्यानं फसवणूक केल्याचं समोर आलंय. एक बँक अकाऊंट ३० वेगेवगळ्या आधार कार्डशी जोडून लाडकी बहीण योजनेत फसवणूक केल्याचा आरोप होत आहे. खारघरमधील महिला पूजा महामुनी यांच्या आधारकार्डचा गैरवापर करून भामट्यानं फसवणूक केलीय. त्याची तक्रार पनवेल तहसीलदारांकडे करण्यात आलीय.. अर्ज वारंवार भरूनही दाखल होत नसल्यानं त्यांनी याची तक्रार स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांकडे केलीय.. त्यानंतर भामट्यानं फसवणूक केल्याचं समोर आलंय...साताऱ्यातील जाधव नावाच्या व्यक्तीनं पत्नीच्या नावे १ नव्हे तर ३० अर्ज भरल्याचं समोर आलंय..खारघर मधील महिला पुजा प्रसाद महामुनी यांच्या आधारकार्डचा गैरवापर झाल्याचे समोर आल्या नंतर पनवेल तहसिल कार्यालयात ही तक्रार दाखल केली आहे. महामुनी यांचा अर्ज वारंवार भरून देखील सबमिट होत नसल्याने त्यांनी पनवेल मधील भाजपचे माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्याकडे तक्रार केली. यानंतर निलेश बाविस्कर यांनी शोध घेतला असता पुजा महामुनी यांचा अर्ज आधीच अप्रूव्हड झाले असल्याचे समोर आले. मात्र, त्यांच्या आधारकार्डला सातारा येथील जाधव नामक व्यक्तिचा मोबाईल नंबर ड झाला होता. याबाबत अधिक माहिती मिळवली असता जाधव नावाच्या या व्यक्तीने आपल्या पत्नीच्या नावे एक नव्हे तब्बल ३० अर्ज भरल्याचे दिसून आले. यानंतर सदरची तक्रार पनवेल तहसिलदारांकडे करण्यात आली असून तहसीलदारांनी ही तक्रार रायगड जिल्हाधिकारी यांच्या कडे पाठवली असून याप्रकरणात तपास सुरू असल्याची माहिती तहसीलदार विजय पाटील यांनी दिली.

## दंतेवाडामध्ये नक्षलवाद्यांविरोधात 'सर्जिकल स्ट्राइक' सुरक्षा दलांकडून ९ जण ठार, चकमक सुरू

रायपूर/वृत्तसंस्था

छत्तीसगडमधील दंतेवाडा आणि बीजापूर जिल्ह्याच्या सीमाभागात सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात जोरदार चकमक सुरू आहे. या चकमकीत सुरक्षा दलाने आतापर्यंत ९ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. घटनास्थळी नक्षलवाद्यांच्या मृतदेहासह एसएलआर ३०३ आणि १२ बोर शस्त्रे सापडली आहेत.

हाती आलेल्या माहितीनुसार पश्चिम बस्तर विभागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या संयुक्त शोध पथकाने मोहीम सुरू केली. मंगळवारी सकाळी १०.३० वाजता शोध मोहीमे दरम्यान पोलिस दलातील जवानांसमोर पीएलजीए कंपनी नंबर २ च्या नक्षलवादी आले. त्यानंतर दोन्ही बाजूने गोळीबार झाला. या चकमकीत सुरक्षा दलाने नक्षलवाद्यांना जोरदार उत्तर दिले आणि ९ नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्र साठा जप्त करण्यात आला आहे.या चकमकी संदर्भात दंतेवाडाचे एसपी गौरव राय यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळावरून आम्हाला मृतदेह सापडले आहेत. सध्या या परिसरात सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे. चकमकीत सहभाग झालेले सर्व सुरक्षा दलातील जवान सुरक्षित आहेत.

# भारताने पॅरालिम्पिकमध्ये एकाच दिवसात जिंकली तब्बल ८ पदकं; दोन सुवर्ण

पॅरिस /वृत्तसंस्था




पॅरालिम्पिकमध्ये भारताची अप्रतिम कामगिरी कायम आहे. पॅरालिम्पिक गेम्स २०२४ च्या ५व्या दिवशी भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीसर इतिहास घडवला. सोमवार, २ सप्टेंबर रोजी पॅरालिम्पिकमध्ये भारताने एकूण ८ पदकं जिंकली आहेत. याआधी पॅरालिम्पिकच्या इतिहासात भारताने एकाच दिवसात इतकी पदकं जिंकली नव्हती. यासह भारताच्या खात्यात आता एकूण १५ पदकं झाली आहेत. त्यामुळे भारताला पदकतालिकेत फायदा झाला.पॅरिस पॅरालिम्पिकच्या पदकतालिकेत भारत आता १५व्या स्थानावर आहे. ५व्या दिवसाचे सामने सुरू होण्यापूर्वी भारताच्या खात्यात ७ पदकं होती आणि देश २७व्या स्थानावर होते. भारताने आतापर्यंत एकूण ३ सुवर्णपदकं पटकावली आहेत, जी नेमबाजी, पॅरा बॅडमिंटन आणि भालाफेकमध्ये मिळवली आहेत.

**थलेटिक्समध्ये भारताची आश्चर्यकारक कामगिरी**

योगेश कथुनियाने पॅरालिम्पिक २०२४ च्या ५व्या दिवशी भारतासाठी पदक मिळविण्याची सुरुवात केली, त्याने पुरुषांच्या डिस्कस थ्रो स्पर्धेच्या अंतिम फेरीत रौप्य पदक जिंकले. याशिवाय भारताने ५व्या दिवशी दोन सुवर्णपदकं जिंकली. ज्यामध्ये सुमित अंतिलने भारताच्या सुवर्णपदकांची संख्या तीनवर नेली, त्याने पॅरालिम्पिक २०२४ च्या फायनलमध्ये विक्रमी ७०.५९ मीटरच्या सर्वोत्तम भालाफेकसह सुवर्णपदक जिंकले.

**बॅडमिंटनमध्ये भारताने जिंकली सर्वाधिक पदकं**

भारताने ५व्या दिवशी बॅडमिंटनमध्ये सर्वाधिक पदकं जिंकली. पॅरा बॅडमिंटन स्टार नितेश कुमारने पुरुष एकल पॅरा बॅडमिंटन अंतिम सामना जिंकून भारतासाठी दुसरे सुवर्णपदक जिंकले. बॅडमिंटनमध्ये पदक जिंकणारा तो एकमेव खेळाडू नव्हता, कारण सुहास यथीराज आणि थुलासिमाथी मुरुगेसन यांनी रौप्यपदक जिंकले, तर मनीषा रामदास यांनी कांस्यपदक जिंकले. दरम्यान, नित्या श्री सिवनने महिला एकेरी बॅडमिंटन स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. हाताविना तिरंदाजी करणारी भारताची उत्कृष्ट तिरंदाज शितल देवी आणि अनुभवी राकेश कुमार यांनी पॅरा तिरंदाजी मिश्र सांघिक कंपाऊंड स्पर्धेत कांस्यपदक जिंकले.

**पदकतालिका**

पॅरालिम्पिक गेम्स २०२४ च्या खेळाच्या ५व्या दिवसानंतर आपण पदकतालिकेवर एक नजर टाकल्यास, चीन पहिल्या स्थानावर आहे. त्यांच्या खात्यात एकूण ८७ पदके आहेत. ज्यामध्ये ४३ सुवर्ण, ३० रौप्य आणि १४ कांस्यपदकांचा समावेश आहे. ग्रेट ब्रिटन दुसऱ्या स्थानावर आहे. त्यांनी २९ सुवर्ण, १५ रौप्य आणि १० कांस्य पदके जिंकली आहेत. अमेरिका ४२ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. ज्यामध्ये १३ सुवर्ण, १९ रौप्य आणि १० कांस्य पदके आहेत. तर भारत ३ सुवर्णपदकं, ५ रौप्यपदकं आणि ७ कांस्यपदकांसह एकूण १५ पदके जिंकत १५ व्या स्थानी आहे.

हे दैनिक मुद्रक, प्रकाशक, संपादक **अंकुशराव नानासाहेब कदम** यांनी लोकपत्र पेपर्स प्रा.लि.करिता कदम प्रिंटोक्रॅट प्रा.लि., ए-४/२ औद्योगिक वसाहत, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर येथे छापून २, जिल्हा परिषद शॉपिंग कॉम्प्लेक्स नांदेड येथे प्रकाशित केले.
कार्यकारी संपादक **रवींद्र तहकीक*** (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील)
अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतात असे नाही. दैनिक 'लोकपत्र' मधील लेखांचे सर्व हक्क राखून ठेवले आहेत.
RNI Register No. 49950/91 पोस्ट परवाना क्र. G-2/RNP/NND/80/2015-2017 www.lokpatranewslive.com E-Mail -lokpatraned@gmail.com, lokpatra2016@gmail.com